गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर.
फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक)
Mo. 9372444001

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अ‍ॅण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०४.१०.२०२५ | अंक नं. १५६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी
लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | कडली | फॅन्सी चेन व पेंडेंट | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | घड्याळे
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
फॅन्सी पायलच्या 3000 पेक्षाही अधिक डिझाईन उपलब्ध

# अहिल्यानगर महापालिका रस्ते घोटाळाप्रकरणी उच्च न्यायालयाच्या खंडपीठात जनहित याचिका

## या लढाईत मी एकटा नाही तर लाखो नगरकर देखील सहभागी : शिवसेना ठाकरे गटाचे शहरप्रमुख किरण काळे



अहिल्यानगर मनपा हद्दीतील रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. कामे अर्धवट अवस्थेत बंद पडली आहेत. निकृष्ट कामांमुळे जागोजागी खड्डे पडलेत. नागरिक त्रस्त आहेत. शहरातील ७७८ रस्त्यांच्या कामांमध्ये दर्जा तपासणारे गुणवत्ता अहवाल बनावट टेस्ट रिपोर्ट, थर्ड पार्टी रिपोर्ट तयार करून कोट्यवधींची बिले लाटत घोटाळा केल्याची तक्रार ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे सन २०२३ पासून प्रशासन, सरकारकडे करत आहेत. मात्र त्याची कोणतीही दखल न घेतली गेल्यामुळे, अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठामध्ये घोटाळ्यातील दोषींवर कायदेशीर कारवाईसाठी जनहित याचिका (पीआयएल) दाखल केली असल्याची माहिती काळे यांनी दिली आहे. किरण गुलाबराव काळे विरुद्ध महाराष्ट्र शासन आणि इतर अशी २२ सप्टेंबर २०२५ रोजी खंडपीठात याचिका दाखल झाली आहे.

काळे म्हणाले, माझी खोट्या बलात्काराच्या गुन्ह्यातून जामिनावर सुटका झाल्यानंतर अनेक नागरिकांनी भेट घेत या घोटाळ्या विरुद्ध न्यायालयात याचिका दाखल करण्याचा आग्रह आपल्याकडे धरला. दहशत, गुंडगिरी, दबाव यामुळे सर्वसामान्य नगरकर तक्रार करत नाहीत. समोर येऊन बोलू शकत नाहीत. त्यामुळे ही जनहित याचिका तांत्रिकदृष्ट्या मी दाखल केली असली तरी ती या शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने दाखल केली आहे. या लढाईत मी एकटा नसून कर भरणारे नगरकर रस्त्यांसाठी लढत आहे.

काळे यांनी मे २०२३ पासून १४ जुलै २०२५ पर्यंत सर्व स्तरावर लेखी तक्रारी केल्या. आंदोलने केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात आत्मदहन करण्याचा इशारा दिला. त्यावेळी तोफखाना पोलिसांनी काळे यांना आंदोलना पूर्वीच ताब्यात घेतले. मनपा आयुक्तांच्या मान्यतेने उपायुक्त, शहर अभियंता यांनी पोलीस निरीक्षकांच्या दानात ३१ मे २०२३ रोजी काळे यांच्याशी चर्चा करत दीड महिन्याच्या आत चौकशी पूर्ण करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याचे लेखी आश्वासन देखील दिले. मात्र त्याची पूर्तता झाली नाही. त्यानंतर काळे यांनी अँटी करप्शनचे पोलीस महासंचालक विश्वास नांगरे पाटील यांच्याकडे धाव घेत २८ नोव्हेंबर २०२३ रोजी तक्रार दाखल केली. पुरावे सादर केले. तक्रारीचा पाठपुरावा केला. त्यानंतर तब्बल एक वर्षाने ७ ऑक्टोबर २०२४ रोजी अहिल्यानगर अँटी करप्शनने काळेंचा जबाब नोंदवला. मात्र त्यानंतर हे प्रकरण राजकीय दबावातून पुन्हा दडपले गेल्याचे काळे यांचे म्हणणे आहे.

**यांच्याकडे केल्या तक्रारी :** आजपर्यंत या प्रकरणात किरण काळे यांनी मुख्यमंत्री, नगर विकास, गृह, उच्च व तंत्र शिक्षण खात्यांचे मंत्री, पालकमंत्री, राज्याचे मुख्य सचिव, नगर विकास, गृह, उच्च व तंत्र शिक्षण विभागांचे प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण आयुक्त, विभागीय सहसंचालक, नाशिक विभागीय आयुक्त, विभागीय पोलीस महानिरीक्षक, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, मनपा आयुक्त, शासकीय तंत्रनिकेतन प्राचार्य यांच्याकडे दोषींवर गुन्हा दाखल करण्याची तक्रार केली. त्याची कोणीही दखल घेतली नाही. त्यामुळे अखेर काळे यांनी लोकाग्रहास्तव खंडपीठात जनहित याचिका दाखल केली.

**गुन्हा घडल्याचे चौकशी अहवालात सिद्ध :** किरण काळेंच्या तक्रारीनंतर शासकीय तंत्रनिकेतनने पाच सदस्सीय समिती गठीत केली. सखोल चौकशी केली. यातून धक्कादायक माहिती उघड झाली. ७७८ रस्त्यांच्या कामांचे गुणवत्ता अहवाल हे राजपत्रित अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या, *(पुढील मजकूर पान २ वर)*

# दसऱ्याच्या दिवशी घरातून ६ लाख ९० हजार रुपयांच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी

## डॉक्टर कॉलनीतील घटना

नगर - दसऱ्याच्या दिवशी कुटुंब काही वेळाकरिता घराबाहेर गेल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी घराच्या सेफ्टी दरवाजाचे कुलूप तोडत आत प्रवेश करून कपाटातील सुमारे ६ लाख ९० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना शहरातील वाकोडी रोडवरील सागर व्हिडीओकॉन कंपनी समोर असलेल्या डॉक्टर कॉलनी येथे २ ऑक्टोबर रोजी रात्री ८.१५ ते १० या कालावधीत घडली.

याबाबत राहुल सुनील ससाणे (वय ३१, रा.सागर व्हिडीओकॉन कंपनीसमोर, डॉक्टर कॉलनी, वाकोडी रोड) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचे कुटुंबिय हे दसऱ्याच्या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमासाठी महात्मा फुले चौकात गेले होते. त्यावेळी अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराच्या पार्कींग मधील जिन्यास असलेल्या लोखंडी सेफ्टी डोअरचा कोयंडा तोडून घराचा दरवाजा उघडून आत प्रवेश केला. घरात सर्वत्र उचकापाचक करत बेडरूममधील लोखंडी व लाकडी कपाटात ठेवलेले ६ लाख ९० हजार ८०० रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेले. फिर्यादी हे रात्री १० वाजता घरी गेले असता त्यांना घरात चोरी झाल्याचे निदर्शनास आले.

त्यांनी तातडीने याबाबत कोतवाली पोलिसांना माहिती दिली.

ही माहिती मिळताच शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक दिलीप टिपरसे, कोतवाली पो. नि. संभाजी गायकवाड यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी भेट देत पाहणी केली. याबाबत ३ ऑक्टोबरला पहाटे राहुल ससाणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध बी.एन.एस. कलम ३३१ (४), ३०५ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक शितल मुगडे या करीत आहेत.

फर्निश्ड फ्लॅट विकणे
2BHK फ्लॅट दुसरा मजला
पार्किंगसह नगर कल्याण रोड, ड्रिमसिटी येथे
योग्य किंमत आल्यास विकणे आहे
दुकान विकणे
नगर-कल्याण रोड ड्रिमसिटी येथे
३५० स्क्वे.फुट दुकान विकणे आहे
संपर्क-9867795499

ज्योतिष संबंधी
जगातील पहिली वेबसाईट
ज्योतिषविषयक सर्व प्रश्नांची उत्तरं,
सोप्पे उपाय फक्त २०० रुपयात
पत्रिकेची गरज नाही प्रश्न निवडा-योग्य उत्तर,
प्रभावी उपाय मिळवा सुमारे १६ वर्षाचा अनुभव
वेबसाईट- Greatanswer.in

॥श्री गणेशाय नमः॥ ॥श्री गुरुदेव दत्त॥
॥श्री संत शिरोमणी नरहरी महाराज प्रसन्न॥
स.न.वि.वि. आमचे येथे श्री कुलस्वामिनी कृपेने
गुरुदत्त
गोल्ड कास्टिंग
भव्य शुभारंभ
कोजागिरी पोर्णिमाच्या शुभमुहुर्तावर, सोमवार दि. ६/१०/२०२५ रोजी
मा. आ. श्री संग्राम भैय्या अरुणकाका जगताप
यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्याचे योजिले आहे. तरी आपण सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही नम्र विनंती.
*आपले नम्र*
श्री. सुनिल गजाननराव देवळालीकर | श्री. जगदीश गजाननराव देवळालीकर
चि. पृथ्वीराज सुनिल देवळालीकर | चि. प्रेम सुनिल देवळालीकर
चि. युवराज जगदीश देवळालीकर | चि. यशराज सुनिल देवळालीकर
समस्त देवळालीकर परिवार
*स्थळ: रामचंद्र खुंट, राज मेडिकल समोर, अहिल्यानगर
*वेळ: स.११.३० ते आपल्या आगमनापर्यंत

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
दसरा - दिवाळी
03 04 05 06
ऑक्टोबर
दिवस आनंदाचे
4 दिवस दिवाळीपूर्व खरेदीचे
10% ॲडिशनल डिस्काऊंट
ही योजना फक्त अहिल्यानगर व श्रीरामपूर शाखेकरिता..
अ.नगर (0241) 2999299 | संगमनेर (02425) 222226 | श्रीरामपूर (02422) 220090 | नारायणगाव (02132) 242132

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# रस्ते घोटाळाप्रकरणी उच्च न्यायालयात जनहित याचिका

*(पान १ वरुन)*

शासकीय आस्थापनेचे बनावट लेटरहेड, बनावट शिक्के वापरून तयार केल्याचे निष्पन्न झाले. मात्र पुढे संगनमत करत राजकीय वरदहस्थातून गुन्हा दाखल न करताच घोटाळा दडपल्याचा आरोप काळे यांनी केला आहे.

**चोर बाहेर, मी तुरुंगात :** या घोटाळ्यात अनेकांचे हात बरबटलेले आहेत. घोटाळा काळातील अभियंता, उपअभियंते, बांधकाम विभागांचे उपायुक्त, कर्मचारी, लेखा विभागाचे अधिकारी, शासकीय तंत्रनिकेतनचे अधिकारी कर्मचारी, ७७८ कामांचे ठेकेदार यांनी संगनमतातून कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केला आहे. बहुतांश कामे निकृष्ट केली गेली. काही कामे न करता कागदावरच बिले लाटली गेली आहेत. या चोरांवर गुन्हे दाखल करून अटक करण्याची मागणी मी नगरकरांच्या वतीने केली. शहराचे रस्ते गिळंकृत करणाऱ्या चोरांच्या राजकीय आकाने खोट्या बलात्काराच्या गुन्ह्यामध्ये गोवून मलाच तरूंगात घातले. आजही हे चोर सत्ताधाऱ्यांमुळे उजळ माथ्याने फिरत चोऱ्या करत आहेत. मात्र नगरकरांच्या तिजोरीवर डल्ला मारणाऱ्या त्या चोरांना आता सुट्टी नाही, असा इशारा किरण काळे यांनी दिला आहे.

# 'इंस्टा'वरील ओळखीतून लग्नाचे आमिष दाखवत तरुणीवर अत्याचार; भेटायला बोलावून केडगावमध्ये टपरीत कोंडून ठेवले, तरुणाला अटक

नगर - इंस्टाग्रामवर झालेल्या ओळखीतून २१ वर्षीय तरुणीशी जवळीक वाढवून तिला लग्नाचे आमिष दाखवत भेटायला बोलावले. त्यानंतर केडगाव मधील एका पान टपरीमध्ये तिला कोंडून ठेवत अत्याचार केले. तिने लग्नाचा विषय काढल्यावर टाळाटाळ करत शिवीगाळ व दमदाटी केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी भंडारा जिल्ह्यातील रहिवासी व सध्या पुण्यात एका कंपनीत काम करत असलेल्या तरुणीने दिलेल्या फिर्यादी वरून कोतवाली पोलिसांनी जहीद फारुख तांबोळी (रा.केडगाव) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे.

पिडीत तरुणी गेल्या ४ वर्षांपासून इंस्टाग्राम वापरत असून त्यावरच तिची आरोपी जहीद तांबोळी याच्याशी ओळख झाली होती. त्यानंतर ते दोघे इंस्टाग्राम च्या माध्यमातून तसेच मोबाईल च्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात होते. गतवर्षी ती तरुणी काम शोधण्यासाठी नागपूर हून पुण्यात गेली, तेंव्हा जहीद तिला भेटायला पेरणे फाटा येथे गेला होता. त्यानंतर त्यांचे फोन वर नेहमी संभाषण होत होते. जहीद हा तिला आपण लग्न करू असे वारंवार म्हणत होता. त्याच्यावर विश्वास ठेवून तिने त्यास होकार कळविला व १६ सप्टेंबर रोजी पहाटे त्याला पहिल्यांदा भेटण्यासाठी ती बसने नगरमध्ये आली. त्यावेळी पुणे बसस्थानकावरून त्याने तिला दुचाकीवर केडगाव येथे त्याच्या लहर पान शॉप येथे नेले. तेथे तिच्या मनाविरुद्ध अत्याचार केला. त्यानंतर त्या पान टपरीत तिला कोंडून ठेवले. २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ च्या सुमारास दौंड रोडवरील एका लॉज मध्ये नेवून पुन्हा तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर तिने लग्नाचा विषय काढला असता. नंतर पाहू, तू आता पुण्याला जा असे सांगून तिच्याशी लग्न करण्यास टाळाटाळ करू लागला. तिला शिवीगाळ करत दमदाटी केली.

त्यामुळे आरोपी जहीद याने आपल्याला लग्नाचे आमिष दाखवत शारीरिक अत्याचार केला व नंतर लग्नास टाळाटाळ करत फसवणूक केली असल्याचे पिडीत तरुणीने दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी जहीद तांबोळी याच्या विरुद्ध ४ ऑक्टोबर रोजी पहाटे बीएनएस कलम ६९, ३५१ (२), ३५२, १२७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे.



कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे आणणाऱ्या दोघांना पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# कत्तलीसाठी आणलेल्या गोवंशीय जनावरांची सुटका

## दोघे जण ताब्यात, ६ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

नगर - कत्तलीसाठी आणलेल्या ४ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुटका केली आहे. यावेळी दोघांना ताब्यात घेत त्यांच्या कडून ६ लाख ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कारवाई ४ ऑक्टोबर रोजी पहाटे नेवासा तालुक्यातील घोडेगाव शिवारात असलेल्या बराटे वस्ती येथे करण्यात आली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. हरिष भोये, उपनिरीक्षक दिपक मेढे, पोलीस अंमलदार दिपक घाटकर, शामसुंदर गुजर, बिरप्पा करमल, सोमनाथ झांबरे, राहुल डोके, विशाल तनपुरे, महादेव भांड, यांचे पथक सोनई पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध कत्तलखान्याची माहिती काढत असतांना पथकास इसम असिफ शेख व अविनाश बराटे या दोघांनी कत्तल करण्याचे उद्देशाने गोवंशीय जनावरे आणलेले असुन ते कत्तलीसाठी घेवुन जाणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने बराटे वस्ती, घोडेगांव या ठिकाणी जावून खात्री करता दोन इसम पिकअप वाहनातून गोवंशीय जनावरे खाली उतरवतांना दिसली.

पोलिसांनी असिफ अतिक शेख (वय २८, रा. चांदा, ता. नेवासा) व अविनाश मोहन बराटे (वय ३७, रा. बराटे वस्ती, घोडेगांव, ता. नेवासा) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १ लाख ६० हजार रुपये किमतीचे ४ गोवंशीय जिवंत जनावरे व ५ लाख रुपये किमतीची पिकअप गाडी (क्र.एम.एच. १७ बी. डी. ०११२) असा एकुण ६ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दोघा आरोपीविरुध्द पो.ना. सोमनाथ झांबरे यांचे फिर्यादीवरुन सोनई पोलीस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५ (अ), ५ (ब), ९ (ब), प्राण्यांना निर्दयतेने वागविणेचे कलम ३ व ११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# टीईटी वादावर महाधिवक्त्यांचा सल्ला घ्यावा

## अनावश्यक धास्ती, गोंधळ व गैरसमज दूर करून शिक्षकांना विश्वासात घेणे अत्यावश्यक : जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे

नगर - महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) संदर्भात निर्माण झालेली समस्या निकाली काढण्यासाठी शासनाने तातडीने महाधिवक्त्यांचा सल्ला घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री पंकज भोयर, तसेच शिक्षण आयुक्त यांना निवेदन पाठविल्याची माहिती परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यानंतर प्रसारमाध्यमांतून आलेल्या बातम्या, सामाजिक माध्यमांवरील चर्चासत्रे व शिकवणी वर्गांच्या जाहिरातींमुळे शिक्षक संवर्गामध्ये मोठ्या प्रमाणावर आक्रोश व संभ्रम निर्माण झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



भारतीय राज्यघटनेत २००२ साली दुरुस्ती करून ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण हा मूलभूत अधिकार प्रदान करण्यात आला. त्यानंतर केंद्र सरकारने बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मंजूर केला व त्याची अंमलबजावणी १ एप्रिल २०१० पासून सुरू झाली. सर्वोच्च न्यायालयाने १२ एप्रिल २०१२ रोजी या कायद्याला वैधता दिली. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने २०११ मध्ये बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम अधिसूचित केला.

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या अधिसूचनेनुसार १३ फेब्रुवारी २०१३ पासून प्राथमिक शिक्षक नियुक्तीसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण करणे अनिवार्य करण्यात आले. नंतर ७ फेब्रुवारी २०१९ रोजीचा शासन निर्णयही याच तरतुदी अधिक ठोसपणे अधोरेखित करतो. या दोन्ही निर्णयांनुसार १३ फेब्रुवारी २०१३ किंवा ७ फेब्रुवारी २०१९ नंतर प्राथमिक शिक्षक पदावर नियुक्त होणाऱ्यांना टीईटी उत्तीर्ण करणे बंधनकारक आहे. परंतु या कालावधीपूर्वी नियुक्त झालेल्या प्राथमिक शिक्षकांना टीईटी अनिवार्य नाही, हे स्पष्ट आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या १ सप्टेंबर २०२५ रोजीच्या निवाड्यानंतर, कार्यरत प्राथमिक शिक्षकांना दोन वर्षांत टीईटी उत्तीर्ण न झाल्यास सेवेतून वगळले जाईल! अशा स्वरूपाचे संदेश सोशल मीडियासह विविध माध्यमांतून प्रसारित झाले. यामुळे हजारो शिक्षक भीती व मानसिक तणावात आले आहेत. परंतु प्रत्यक्षात विद्यमान कायदेशीर तरतुदी अशा स्वरूपाच्या नाहीत.

या परिस्थितीत निर्माण झालेल्या गैरसमजांना आळा घालण्यासाठी आणि शिक्षक संवर्गातील अस्वस्थता दूर करण्यासाठी शासनाने तातडीने महाधिवक्त्यांचा अधिकृत सल्ला घ्यावा आणि स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी शिक्षक परिषदेने केली आहे. अनावश्यक धास्ती व गोंधळ दूर करून शिक्षकांना विश्वासात घेणे अत्यावश्यक असल्याचे बाबासाहेब बोडखे यांनी म्हटले आहे.

# जिल्ह्याच्या हद्दीत ४ व ५ ऑक्टोबरदरम्यान पॅराग्लाईडींग करण्यास मनाई

नगर - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीमध्ये ४ व ५ ऑक्टोबर दरम्यान लोणी ता. राहाता तसेच कोपरगाव येथे विविध कार्यक्रम होणार आहेत. त्यामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव अपर जिल्हादंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये अहिल्यानगर जिल्ह्याच्या हद्दीत ४ व ५ ऑक्टोबर या कालावधीमध्ये पॅराग्लाईडींग करण्यास मनाई आदेश जारी केले आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यावर भारतीय न्याय संहिता कलम २२३ तसेच इतर लागू कायद्यान्वये कारवाई करण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

# मॉर्निंग वॉकला गेलेल्या तरुणीचा भरधाव वाहनाच्या धडकेत मृत्यू

नगर - मॉर्निंग वॉकला गेलेल्या तरुणीचा भरधाव वाहनाच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना नगर जिल्ह्यातील नेवासा फाटा ते शेवगाव रस्त्यावर भानसहिवरे शिवारात ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास घडली. सुप्रिया आदिनाथ पवार (वय १९, रा. भानसहिवरे ता.नेवासा) असे मयत तरुणीचे नाव आहे.



**सुप्रिया पवार (मयत)**

मयत सुप्रिया हिचे कुटुंबीय तिचे लग्न जुळविण्याच्या तयारीत होते. ३ ऑक्टोबर रोजीच तिला पाहुणे पाहायला येणार होते. मुलीला पाहण्यासाठी पाहुणे येणार असल्यामुळे घरात उत्साह आणि आनंदाचे वातावरण होते. आई-वडिल सकाळीच उठून घर स्वच्छ, निटनेटके केले. मात्र नियतीला हे मान्य नव्हते. सुप्रिया ही पहाटे उठून शेवगावकडील रस्त्याने मॉर्निंग वॉकला गेली. ती फिरुन घरी येत असतांना पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाने धडक दिली. यात तिचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना हॉटेल जयराज नजिक घडली. सुप्रिया हिचे इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण झाले होते. तिला पाहुणे पाहण्यासाठी येण्याचा नियोजित कार्यक्रम ठरलेला होता. त्यामुळे तिचे आई-वडील आणि तिचे तीन भाऊ सकाळीच उठून घरातील आवरासावर करण्यात मग्न होते.

सुप्रिया मॉर्निंगवॉकला गेली व पुन्हा घराकडे परतत असताना भानसहिवरे येथील हॉटेल जयराज नजिक एका अज्ञात वाहनाने तिला पाठीमागून जोराची धडक दिली. यात ती गंभीर जखमी झाली. तिला उपचारासाठी नेवासे फाटा येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकिय अधिकाऱ्यांनी तिला मृत घोषित केले.

शोकाकूल वातावरणात सुप्रिया हिच्यावर अंत्यसंस्कार केले.

# अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट' : हवान विभागाचा अंदाज

नगर - भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार ४ ऑक्टोबरपर्यंत अहिल्यानगर जिल्ह्यात वीजांचा कडकडाट, हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट'जारी करून नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

### नद्यांच्या विसर्गात वाढ; पूरस्थितीचा धोका

पुणे, नाशिक, अहिल्यानगर व छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील धरणांमधून सोडलेल्या विसर्गामुळे नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होऊ शकते. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

सध्या भिमा नदीवर दौंड पूल येथे १२,०३८ क्युसेक, गोदावरी नदीवरील नांदूर मध्यमेश्वर धरणातून ६,३१० क्युसेक, जायकवाडी धरणातून २८,२९६ क्युसेक, प्रवरा नदीवरील निळवंडे धरणातून १,३५६ क्यूसेक,ओझर बंधारा २,७५७ क्युसेक, मुळा धरणातून ३,००० क्युसेक, घोड धरणातून ४,००० क्युसेक, सीना धरणातून ३,३९३ क्युसेक, कुकडी नदीवरील येडगांव धरणातून ५०० क्युसेक, हंगा नदीवरील विसापूर धरणातून १,२२० क्युसेक, खैरी धरण येथून ५१९ क्सुसेक इतका विसर्ग सुरू आहे.

### प्रशासनाकडून नागरिकांना सूचना

मेघगर्जनेच्या वेळी, विजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.

गडगडाटीच्या वादळादरम्यान व विजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये, वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातूचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रॉन्सफॉर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या/लोंबणाऱ्या केबल्स्पासून दूर रहावे.

जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी, विजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.

धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये.

नदी, ओढे व नाल्याकाठच्या नागरिकांनी दक्ष रहावे. पाणीपातळीत वाढ होत असल्यास नागरिकांनी नदीपात्रापासुन तसेच ओढे व नाले यापासून दूर रहावे व सुरक्षीत स्थळी स्थलांतर करावे. नदी, ओढे-नाल्यांवरील पुल व बंधाऱ्यांवरुन पाणी वाहत असल्यास पुल/बंधारे ओलांडू नये. नागरिकांनी स्थानिक प्रशासनाने दिलेल्या सुचनांचे पालन करावे. आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवण्यापूर्वीच सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे.

जुनाट/मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतीमध्ये आश्रय घेऊ नये.

अतिवृष्टीमुळे भूस्खलन होण्याची व दरडी कोसळण्याची शक्यता असते. त्यादृष्टीने डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या लोकांनी दक्षता घ्यावी व वेळीच सुरक्षीत स्थळी स्थलांतर करावे. घाट रस्त्याने प्रवास करणे शक्यतो टाळावे.

### जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे

जिल्हा नियंत्रण कक्षाचा टोल-फ्री क्रमांक १०७७ असून दूरध्वनी क्रमांक ०२४१-२३२३८४४ व २३५६९४० उपलब्ध आहेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# विमलबाई घुले यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - पारगल्ली, माळीवाडा येथील रहिवासी विमलबाई विठ्ठलराव घुले (वय ८९) यांचे ४ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ बहीण, १ मुलगा, १ मुलगी, सुन, नातवंडे, जावई असा परिवार आहे. जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले यांच्या त्या वहिनी तसेच शहर बँकेचे संचालक माजी नगरसेवक संजय घुले यांच्या मातोश्री होत.

# सुनील ढोरे यांचे दु:खद निधन



नगर - सावेडी परिसरातील पाईपलाईन हडको येथील रहिवासी सुनील बाळकृष्ण ढोरे (वय ६६) यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर ४ ऑक्टोबर रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, जावई असा परिवार आहे.

# गोरक्ष चव्हाण यांचे अल्प आजाराने निधन

नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी गोरक्ष तुकाराम चव्हाण (वय ७०) यांचे ४ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कैलास व सचिन चव्हाण यांचे ते वडील होत. ते चिचोंडी पाटील येथील हॉटेलचे संचालक होते.

# डेंग्यूबाबत नागरिकांमध्ये जनजागृती अभियान

## अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने बागडपट्टी तोफखाना येथे डेंगू मुक्त कार्यक्रम : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर - शहरामध्ये डेंग्यू मुक्त अभियान सुरू केले असून १७ आठवड्यामध्ये १८ हजार ७२२ घरांना भेटी दिल्या असता ५१ हजार ८०० पाणीसाठे तपासले असून ७१२ डेंग्यू सदृश्य अळया आढळून आल्या असता पाणीसाठे नष्ट करत औषध फवारणी केली, तसेच नागरिकांच्या आरोग्य तपासणी करत रक्ताचे नमुने तपासणी सध्या शहरात जानेवारी ते सप्टेंबरपर्यंत डेंग्यूचे १३ रुग्ण आढळले आहे. नागरिकांमध्ये डेंग्यू आजाराबाबत अभियानाच्या माध्यमातून जनजागृती केली असल्यामुळे डेंग्यू आजाराच्या रुग्णांची संख्या कमी आढळली असून अभियानाला यश आले, सिताराम सारडा प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी डेंग्यूबाबत आपल्या भाषणातून जनजागृती करत पाहुण्यांची मने जिंकली, शाळा विद्यार्थ्यांसाठी राबवत असलेले उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन मनपा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.



अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने बागडपट्टी तोफखाना येथे डेंगू मुक्त अभियानानिमित्त नागरिकांच्या घरोघरी जाऊन पाणीसाठ्याची तपासणी करताना आयुक्त यशवंत डांगे समवेत माजी उपमहापौर मालन ढोणे आदी.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने बागडपट्टी तोफखाना येथे डेंग्यू मुक्त अभियानानिमित्त नागरिकांच्या घरोघरी जाऊन पाणीसाठ्याची तपासणी करण्यात आली.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे, माजी उपमहापौर मालनताई ढोणे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, मुख्याध्यापिका नंदा कानिटकर, घनकचरा विभाग प्रमुख अशोक साबळे, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, डॉ. सृष्टी बनसोडे, हिवताप आरोग्य निरीक्षक पुरुषोत्तम आडेप आदीसह विद्यार्थी, शिक्षक, पालक, नागरिक उपस्थित होते

मालनताई ढोणे म्हणाल्या की, महापालिकेच्या युक्त यशवंत डांगे हे शासनाच्या आरोग्य विभागाच्या योजना कागदावर न ठेवता त्या जनतेपर्यंत घेऊन जाण्याचे काम करत आहे, नागरिकांमध्ये डेंग्यू आजाराबाबत जनजागृती केली असल्यामुळेच डेंग्यू आजाराचे रुग्ण कमी प्रमाणात आढळले आहे तसेच तोफखाना आरोग्य विभागाचे अधिकारी कर्मचारी चांगले काम करत असल्याचे त्या म्हणाल्या.

मुख्याध्यापिका नंदा कानिटकर म्हणाल्या की, नागरिकांनी स्वच्छतेची सुरुवात आपल्या घरापासून, परिसरापासून सुरू करून डेंग्यू आजाराच्या डासाला हद्दपार करू, प्रत्येक गोष्ट शासनावर अवलंबून न राहता नागरिकांनी देखील सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सामाजिक बांधिलकी जोपासत समाजासाठी आपले कर्तव्य पार पाडणे गरजेचे आहे यासाठी आपण साठवून ठेवलेले पाणीसाठे तपासावी, परिसर स्वच्छ ठेवावे, आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा अशा त्या म्हणाल्या.

यावेळी इयत्ता सातवी मधील प्रशिका जाधव व इयत्ता चौथी मधील अर्णवी कांबळे या विद्यार्थिनी डेंग्यू या विषाणूजन्य आजारावर सविस्तर असे भाषण करत स्मृतींची मने जिंकली. कार्यक्रमाची प्रास्ताविक डॉ. सृष्टी बनसोडे यांनी केले. मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी आभार मानले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### साखरेचे सेवन न केल्यास...

१५ दिवसांसाठी जर तुम्ही तुमच्या आहारातून साखर पूर्णपणे काढून टाकली तर तुमच्या शरीराचे काय होईल असा तुम्ही कधी विचार केला आहे का? हा एक छोटासा बदल आहे, परंतु त्याचे परिणाम आश्चर्यकारकपणे प्रभावी असू शकतात. आजच्या जगात, जेव्हा आपले आहार प्रक्रिया केलेले पदार्थ आणि गोड पेयेने भरलेले असतात, तेव्हा जास्त साखरेचे सेवन अनेक आरोग्य समस्या निर्माण करत आहे. साखर आणि प्रक्रिया केलेले पदार्थ खाल्ल्याने पचनसंस्थेवर अतिरिक्त ताण पडतो. साखर सोडल्याने तुमच्या आतड्यांमध्ये चांगल्या बॅक्टेरियांची वाढ होते, ज्यामुळे तुमची पचनसंस्था सुधारते. ते फुगणे देखील कमी करते आणि पोटाशी संबंधित अनेक समस्या कमी करते. साखरेचे सेवन झोपेच्या पद्धतींमध्ये व्यत्यय आणू शकते. झोपण्यापूर्वी तुम्ही गोड पदार्थ खाता तेव्हा रक्तातील साखरेचे प्रमाण चढ-उतार होते, ज्यामुळे तुमची झोप बिघडू शकते. साखरेचे सेवन न केल्याने तुम्हाला खोल आणि चांगली झोप येण्यास मदत होईल, ज्यामुळे तुम्हाला सकाळी ताजेतवाने वाटेल.

## पाककला

### पोहे ज्वारी पीठ

**साहित्य** : १/२ कप पोहे, १/२ ज्वारी पीठ, ४/५ लसूण पाकळ्या, १/२ इंच आले, २/३ हिरव्या मिरच्या, १/२ कप दही, १/४ कप किसलेल गाजर, १/४ कप ढोबळी मिरची, १/४ कप टोमॅटो, १/४ कप कांदा, २ टेबलस्पून कोथिंबीर, १.५ टिस्पून मीठ, ४ टेबलस्पून तेल,

**कृती** : प्रथम पोहे स्वच्छ धुवून घ्या नी त्यात दोन टेबलस्पून पाणी घालून १० मिनीट बाजूला ठेवा. पोहे भिजवून दहा मिनीटे झाल्यावर त्यात आल, लसुण, मिरच्या घाला नी थोडे पाणी घालून मिक्सरमधून बारीक वाटून घ्या. आता मिश्रणात दही घालून नंतर थोडे थोडे ज्वारी पीठ आणि पाणी घालून व्यवस्थित मिसळून घ्या. गुठळ्या राहता नये.मिश्रण फेटून घ्या. वरील मिश्रणात आता गाजर, टोमॅटो, ढोबळी मिरची, कोथिंबीर, मीठ घाला व्यवस्थित मिसळून घ्या. थोडे पीठ जाडसरच ठेवा. गॅसवर तवा तापत ठेवा तेल घाला जास्त नको थोडे जाडसरच पीठ घाला नी धिरडे किंवा टोमॅटो ऑम्लेट सारखे करून घ्या. दोन्ही बाजूस शेका. कुरकुरीत पण करू शकता. चटणी किंवा सॉस बरोबर खायला द्या.

## वास्तू

### फळे देणारी झाडे

* तुम्हाला जर फळ देणारी कोणतीही झाडे लावायची असतील तर ती पूर्व दिशेने लावावी.
* जलतरण तलावासाठी उत्तम दिशा म्हणजे ईशान्य.
* दक्षिण, आग्नेय आणि नैऋत्य दिशेतील जलतरण तलावासाठी अयोग्य आहे.

## सौंदर्य

चेहऱ्यावर तजेला येण्यासाठी किसलेल्या काकडीचा रस काढून कॉटन बॉलने चेहऱ्यावर लावा आणि वाळल्यावर चेहरा धुवा.

## सल्ला

महिन्यातून एकदा मिक्सरच्या भांड्यात खडे मीठ बारीक करून घ्या त्यामुळे भांड्याच्या पात्यांना धार येते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. ५ ऑक्टोबर २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, शततारा ०८।०१, पू.भा.३०।१६, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण मानसशास्त्रीय अंतर्दृष्टी घेऊन येईल.

**वृषभ** : आपला एखादा मित्र आपल्या विचारांबद्दल महत्वपूर्ण सल्ला देऊ शकतो. एखादी विषम परिस्थती उद्भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून पाहा.

**मिथुन** : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्या आणि जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्या.

**कर्क** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

**सिंह** : आज रात्री विश्रांती घ्या. रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल.

**कन्या** : आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**तूळ** : घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील.

**वृश्चिक** : ठरविलेले पूर्ण करण्यासाठी असे प्रसंग प्रेरणादायी ठरतील. यथायोग्य विचार करून कार्य करा. वडीलोपार्जित मालमत्तेत वाटा मिळेल.

**धनु** : निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. आरोग्याची काळजी घ्या. व्यापार व्यवसायात वेळ साधारण राहील. देवाण-घेवाण टाळा.


**मकर** : आजचा दिवस आपल्या कार्य-योजनेंसाठी आणि सहकार्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल.

**कुंभ** : अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे. ज्यांच्याबरोबर आपणास वेळ घालवणे आवडते त्यांना वेळ द्या.

**मीन** : पत्नी व मुले यांच्या सहवासामुळे मानसिक शांतता लाभेल. आपले इप्सित साध्य होण्याचे योग येतील. वस्तू व पैसे जपून वापरावेत. चोरी होण्याची शक्यता आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२७७ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) मगरी राहतात म्हणून समुद्राला असेही नाव आहे ५) 'इन्शुरन्स'चे मराठी रूप ७) फळातील रसाळ भाग; मगज ८) अगदी सारखे; तुल्य १०) जीभ; जिव्हा; एक पेय १२) देवांचे शत्रू; असुर; दैत्य; राक्षस १३) मनधरणी; हांजी हांजी; आर्जव १५) वेल; वल्लरी १६) खाण्यासाठी घेतलेला अन्नाचा गोळा; कवळ १८) जमीन नांगरणे, पेरणे इ. शेतीची कामे २०) एकसारखे सतत चिंतन २२) मांडणी; घडण २४) इंधन; इंधनाच्या उपयोगाची लाकडे वगैरे २५) खिडकी; वातायन; झरोका

### शब्दगंध क्र. ७२७६ चे उत्तर



**उभे शब्द :-** १) न सुटणारी घट्ट अशी मिठी २) एक निवृत्त भारतीय क्रिकेटपटू - ++++ घावरी ३) जखमेतून वाहणारा द्रव; सुईद्वारे शरीरात सोडले जाणारे औषध ४) मृत्यूचा देव ५) आकाशातून जाणारे एक वाहन ६) माणुसकी ९) नेहमी; हमेशा ११) नातेवाईक; आप्त १४) पृथ्वीच्या भोवतालचे हवेचे आवरण १७) चालू घडीला; चालू काळात १८) पाकिस्तानातील एक प्रमुख शहर १९) इंग्रजांच्या अगोदर भारतात वसाहती करून गेलेले युरोपीय लोक २१) प्रत्यक्ष; देखत; समोर २३) एक विषारी साप

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : आत्मसमाधान ही खरी समृद्धी आहे, ती प्राप्त करण्याचा प्रयत्न करा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मासिक पाळीच्या काळात उपवास करता येतो का?

आपल्या सर्वांना माहिती आहे की, हिंदू धर्मात महिलांना मासिक पाळीच्या काळात पूजा आणि विधी करण्यास सक्त मनाई आहे. मासिक पाळी ही एक प्रक्रिया आहे जी प्रत्येक महिलेला दर महिन्याला करावी लागते. यामुळे प्रश्न निर्माण होतो की जर आपण मासिक पाळीच्या काळात पूजा करू शकत नसलो तर मासिक पाळीच्या काळात उपवास करता येईल का? हा प्रश्न बहुतेक महिलांना पडतो.

अनेक महिला दर महिन्याला एकादशीचे उपवास, अमावस्येचे उपवास, पौर्णिमा उपवास, दुर्गा अष्टमीचे उपवास, सोमवारचे उपवास आणि गुरुवारचे उपवास पाळतात. सर्वात मोठा प्रश्न म्हणजे मासिक पाळीच्या काळात उपवास करावा का? धार्मिक शास्त्रांनुसार काय योग्य हे देखील जाणून घ्या. मासिक पाळीच्या काळात उपवास करणे शुभ आहे की अशुभ? जर व्रत करताना मासिक पाळी आली तर मी उपवास चालू ठेवावा की थांबवावा? तर धार्मिक शास्त्रांनुसार, जर एखाद्या महिलेला उपवासाच्या आधी मासिक पाळी आली तर तिने उपवास करू नये. तथापि जर तिला उपवासाच्या काळात मासिक पाळी आली तर तिने उपवास सोडण्याची गरज नाही.

धार्मिक शास्त्र आणि ज्योतिषशास्त्रानुसार, जर तुम्ही व्रत केले असेल आणि उपवासाच्या काळात मासिक पाळी आली तर तुम्ही तुमचा उपवास चालू ठेवावा. मासिक पाळीच्या काळात स्वतः विधी करण्याऐवजी, तुम्ही दुसऱ्या कोणाकडून घरी विधी करू शकता. कोणत्याही पूजा साहित्याला स्पर्श न करता मंत्राचा जप करा. जर तुम्हाला मंत्र आठवत नसेल, तर तुम्ही तुमच्या मोबाईल फोनवर मंत्र शोधू शकता आणि तो मनापासून जपू शकता. कारण शारीरिक शक्य नसेल तरी मानसिक भक्ती सर्वात महत्वाची आहे.

धार्मिक शास्त्रांमध्ये असे म्हटले आहे की मासिक पाळी ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे जी दर महिन्याला पुनरावृत्ती होते. अशा परिस्थितीत, जर तुमची मासिक पाळी उपवासाच्या वेळी आली तर त्याचा उपवासावर परिणाम होत नाही. तथापि तुम्ही काही खबरदारी घेतली पाहिजे आणि उपवासाशी संबंधित गोष्टींपासून दूर राहावे. कारण धार्मिक शास्त्रांनुसार, पूजा आणि उपवास तेव्हाच पूर्ण मानले जातात जेव्हा ते खऱ्या भक्तीने आणि मनापासून केले जातात. देव नेहमीच त्याच्या भक्तांच्या उपासनेचे आणि उपवासाचे फळ तेव्हाच देतो जेव्हा ते पूर्ण भक्तीने पूजा करतात.

वैद्यकीय दृष्टिकोनातून पहायला गेले तर मासिक पाळीत शरीरातून रक्तस्राव होतो, त्यामुळे ऊर्जा कमी होते. उपाशी राहिल्यास अशक्तपणा, चक्कर येणे, डोकेदुखी किंवा पोटात गोळे वाढू शकतात. त्यामुळे डॉक्टरांच्या मते या काळात उपवास टाळावा, पौष्टिक अन्न (फळं, भाज्या, दूध, कडधान्यं) खाणं जास्त योग्य ठरतं. धार्मिक श्रद्धा असल्यास तुम्ही हलक्या स्वरूपाचा उपवास (फळाहार, दूध, सुप) करू शकता. पण आरोग्याला प्राधान्य देऊन, शरीराची स्थिती पाहून उपवास ठेवायचा की नाही हे ठरवणे उत्तम.

### भान

एका सरोवरात कुबु ग्रीव् नावाचे कासव राहत होते. दोन हंस तिथे जलविहारासाठी येत. कासवाशी त्यांची मैत्री झाली. कासवाला ते चांगल्या चांगल्या कथा सांगत. एक वर्षी अवर्षणामुळे सरोवर आटले. हंस कासवाला म्हणाले, लवकरच राहिलेला चिखल सुद्धा आटेल. मग तुझं कसं होईल? सह विचारातून एक युक्ती सुचली. एक लांब काठी दोन बाजूंनी हंसाने तोंडात धरावी व मध्यभागी कासवाने पकडावे. हंसाने उडत उडत दुसऱ्या तलावात जावे. त्यांनी कासवाला उडत उडत दुसऱ्या तलावात घेऊन जावे. त्यांनी कासवाला बजावले, मध्ये कोणत्याही कारणासाठी तोंड उघडू नको. नाहीतर उंचावरून पडून प्राण गमावशील. उड्डाण सुरू झाले मध्येच एका गावातील लोक आश्चर्याने पाहत म्हणाले, हे हंस गोल गोल काय नेत आहेत? कासव रागावले ते हंसाला म्हणणार होते. या मूर्खांना एवढेही समजत नाही का? त्यासाठी त्याने तोंड उघडले आणि कासव जमिनीवर पडले.

तात्पर्य : समाजात वागत असताना आपल्याला प्रत्येक वेळी प्रसंगाचे भान ठेवूनच वागले पाहिजे.



## जीवन का अमृत (भाग १)

### गुरू और परमात्मा

यहाँ गुरु अर्जनदेव जी महाराज हमें यही समझा रहे हैं कि परमात्मा के बिना और कोई नहीं है। उसे हम हज़ारों नामों से पुकार सकते हैं, क्योंकि हमारी भाषाएं अलग-अलग हैं। लेकिन हकीकत में तो वह एक है, वह प्रभु, वह परमात्मा जिसने यह सारी सृष्टि रची है, उस परमात्मा के ज़रिये ही सब कुछ चल रहा है। आगे गुरु अर्जनदेव जी महाराज फरमा रहे -

**जो जनु सेवे तिसु पूरन काज ।**
**दास अपुने की राखहु लाज ॥** (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

१. प्रति एकड़ ६ टन गोबर की खाद या हरी खाद जमीन में मिलाकर पौधे लगाने के लिए जमीन तैयार करें। २. बीज बुवाई करते समय और बाद में प्रति २० दिन के बाद २०० ली. जीवामृत एक एकड़ जमीन में जमीन गीली हो तब शाम के समय छिड़काएँ या पानी के साथ छोड़ दें। ३. फल-फूल लगते समय एक एकड़ जमीन के लिए एक टन केंचुवे की खाद, ६० किलो अनाज की खाद और ट्रायकोडर्मा फफूंदी एक किलो और नत्र, स्फुरद तथा पोटाश की उपलब्धि कराने वाले जीवाणु संवर्धक प्रति एक किलो मिलाके जमीन में छोड़ दें।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो ऐकलंत का?
नवरा : मग दुसरं काही करतो का मी लग्न झाल्यापासून ...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* 'इंडोमीटेबल ए वर्किंग वूमन नोटस् ऑन लाईफ वर्क ॲण्ड लीडरशीप' या पुस्तकाच्या लेखिका कोण? - अरुंधती भट्टाचार्य

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास - 'रागावुन, चिडुन...'

एका नातेवाईकाच्या घरी रविवारी गेलो होतो. ज्या पध्दतीने त्याने स्वागत केलं त्यावरुन लक्षात आलं की काहीतरी बिनसलं आहे. त्याला मी स्पष्टच विचारलं 'नेमकं काय झालं?' 'मी जो हँडसेट मुलासाठी आणला आहे तो मुलाला आवडला नाहीय. त्यामुळे त्याचं आणि माझं जरा वाजलंय. मुलगा खुपच चिडला आहे. अर्थात घरातलं वातावरण गरमागरमीचं झालं आहे.' त्याचवेळी मुलगा घरात आला आमची नजरानजर झाली. तो आत निघुन गेला. बाप म्हणाला, 'फुगीर आहे पोट्टं फार.' बापाचं, मुलावर रागावणं माझ्या लक्षात आलं. खरं तर ह्याक्षणी दोघेही आपापल्या जागी योग्यच होते. पण प्रश्न असा होता की माघार घ्यायची कुणी? मुलाची आई कुणाची बाजू घेणार? मुलाची बाजु घेतली तर बापाला राग येणार आणि बापाची बाजु घेतली तर मुलाला राग येणार. इकडे आड तिकडे विहिर अशी आईची अवस्था झालेली. त्यामुळे ती बिचारी शांतपणे बसलेली होती.

ती म्हणाली, 'हा गुंता तुम्हीच सोडवा.' मग मला आणखी थोडा वेळ त्या घरात थांबणं आवश्यक होतं. चॅलेंजिंग काम आलं. स्वीकारलंच पाहिजे असं स्वतःला सांगुन मी मुलाला बोलावलं. मुलगा आला. सध्या काय करतोस ? कसा आहेस? इत्यादि प्रश्न विचारले. त्यानही नाराजीनेच उत्तरं दिली. मग मी त्याला विचारलं, 'तुला कोणता हँडसेट पाहिजे होता?' त्याने उत्तरं दिलं 'आय फोन.' बापाने आणलेला नवीन हँडसेट बापाने माझ्या हातावर ठेवला. रागातच म्हणाला,'जो हॅण्डसेट आणलाय तो घ्यायचा 'आय' फोन ऐवजी हा 'बाप' फोन घे. त्यालाच 'आय' फोन समज.' मुलगा म्हणाला, 'माझ्या मित्राच्या बापाने, मुलाला आयफोन घेऊन दिला. मी हा साधा फोन घेणार नाही.

'दोघांनी एकमेकांकडे रागानं पाहिलं. मुलाची आई रडायला लागली. 'लागली ही बोंबलायला.' मी मध्यस्थी करत म्हणालो, 'तुम्ही रडु नका. शांतपणे हा गुंता सोडवु.' मुलाला मी विचारलं, 'तुझ्या आई, वडिलांना समजुन घेणारा फक्त तुच आहेस. तुच असा हट्ट धरुन बसलास तर त्यांना वाईट वाटणारंच. मित्राला आय फोन, त्याच्या वडिलांनी घेऊन दिला म्हणजे तुलाही आयफोनच घ्यायला पाहिजे हा हट्ट काहीही उपयोगाचा नाही. आपली आर्थिक परिस्थिती आपण समजुन घेतली पाहिजे.' मी बोलत असतांना मधेच वडिल रागाने म्हणाले, ' स्वतःच्या पैश्यांनी आयफोन घे. आय फोन घेण्यासाठी किती कष्ट करावे लागतात हे बघ.'

मी म्हणालो, ' रागावुन, चिडुन, वैतागुन, रडुन कोणताही प्रश्न सुटणार नाही. प्रश्न सोडण्यासाठी शांत मन आमि तन असणं गरजेचं आहे.' मुलाकडे पाहात मी म्हणालो, 'हट्टाने प्रत्येक गोष्ट साध्य होतेच असं नाही. वडिल म्हणतात तसं कर आता तू. उद्यापासून कामाला जा. पैसे साठव आणि आयफोन घे. हा हॅण्डसेट मी, माझ्या मुलासाठी घेऊन जातो.' वडिलांना विचारलं ह्याचे किती पैसे द्यायचे? तेव्हा वडिल म्हणाले, 'तुझ्या मुलासाठी घेऊन जाणार असशील तर पैसे देऊ नकोस. तुझा मुलगा, मला मुलासारखाच आहे.' आता मात्र मुलाने कान टवकारले. 'बरं निघतो मी.' असं म्हणत हॅण्डसेट घेऊन निघालो तर मुलगा म्हणाला, ' हाच माझ्या बापाने घेऊन दिलेला आय फोन समजतो मी.' मुलाने हॅण्डसेट माझ्या हातातुन घेतला. बॉक्स उघडला. हॅण्डसेट पाहिला. त्याला फार आनंद झाला. ' हा फोन सुध्दा भारीच आहे काका' मुलगा माझ्याजवळ बोलला आणि फोन घेऊन घरात गेला. खरंतर हा अनुभव वाचकांपैकी कुणाला तरी आला असेलंच. घटना अत्यंत साधी आहे पण बरंच काही शिकवणारी आहे. मुलगा तो हॅण्डसेट घ्यायला तयारच नव्हता. वडिलांची परिस्थिती आयफोन घेण्यासारखी नव्हती.

बापाला मुलाचा स्वभाव माहित होता. मग आम्ही तिघांनी प्लॅन करुन ही घटना घडवुन आणली आणि तो नवीन हॅण्डसेट मुलाला दिला. घरातल्या सदस्यांनी एकमेकांना आणि घरच्या परिस्थितीला समजुन घेतलंच पाहिजे. आर्थिक परिस्थितीचा विचार न करता वागलं तर कर्जाचा डोंगर व्हायला फार वेळ लागत नाही आणि मग त्या कर्जाच्या डोंगरामुळं ताण तणाव वाढतो, शारिरिक-मानसिकता बदलते आणि संपूर्ण स्वास्थ्य, शांतता हरवुन बसतो आपण. जब घी सिधी उंगलीसे नही निकलता तब उंगली तेढी करनी पडती है.' घरातली एखादी समस्या सोडवण्यासाठी हे असं प्लॅनिंग करावंच लागतं. तुमच्या मुलांना परिश्रम, परिस्थिती आणि पैसा ह्याचं मोल वेळोवेळी लक्षात आणुन द्या. स्वतःची, कुटुंबाची काळजी घ्या.

(लेख क्र.५६९)

**- सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आरोग्य सखी

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

'सीमा मला अंगलट करत होती. तीच माझ्यावर प्रेम करते.'' हे ऐकल्यावर मी कौशल्याबाईंना खडसावले, तुम्ही फक्त सीमालाच का जबाबदार धरता. सख्खी भाची असती तर तुमचा भाऊ असा वागला असता का? आधी तुम्ही त्याच्या शिक्षणाची सोय दुसरीकडे करा. तुमच्या घरात त्याला अजिबात ठेवू नका. सीमाकडून चूक का घडली याचा विचार करा. तिच्याशी प्रेमानं आपुलकीनं बोला. चुका कुणाच्या हातून होत नाहीत? केवळ एका घटनेवर, चुकीवर आयुष्य संपत नाही. उलट वेळीच तुमच्या लक्षात आलं ही चांगली गोष्ट आहे. सीमाला काय योग्य अयोग्य याची जाणीव करून देऊ. तचं शिक्षण परत सुरू करा. तिला एखादा छंद जोपासायला सांगा. उलट या घटनेमुळे ती सावध होऊन नवीन आयुष्याला सुरुवात करेल. एका चुकीसाठी कठोर शिक्षा करून तिच्या आयुष्याचा बळी देणं योग्य नाही.

**(क्रमशः) डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वास्तुकला : नैसर्गिक, भावनिक, उत्कट, प्रमाणबद्ध!






वास्तुकला केवळ गणिताविषयी नसते, ते झोनिंगविषयीही नसते; ते त्या भावनिक, उत्कट संबंधांबद्दल आहे जे आपल्याला आपल्या जागेसोबत जाणवतात.

आर्किटेक्टचर केवळ काही स्वैर रेषा आखण्याविषयी नाही; प्रत्येक रेषेचं महत्त्व असतं! Space planning या संदर्भात खूप महत्त्वाचं ठरतं. नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर नेहमी पूर्ण क्षमतेने व्हायला हवा. इमारत डिझाइन करताना आर्किटेक्टने नेहमी जागेची वैशिष्ट्ये आणि नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता जसे की – नैसर्गिक प्रकाश, पाणी, स्थानिक साहित्य, वनस्पती इत्यादींचा विचार करायला हवा. योग्य साहित्य आणि skylights म्हणजेच प्रकाश झरोके; वापरून कुठल्याही इमारतीच्या आतील भागात अप्रतिम वातावरण निर्माण करता येतं. यांच्यामुळे शुद्ध, उत्कृष्ट आणि आरोग्यदायी सूर्यप्रकाश इमारतीत येतो. त्यामुळे आपोआपच सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

खिडक्या एखाद्या इमारतीच्या elevation म्हणजेच दर्शनीभागाला सुंदर बनवू शकतात किंवा त्याचे नुकसानही करू शकतात. खिडकी ही खरी Design घटक आहे. Design घटक सौंदर्य मूल्यांच्या दृष्टीने नेहमी पूर्ण क्षमतेने वापरायला हव्यात. परंतु खिडकी हा असा घटक आहे, ज्याचा उपयोग उत्कृष्ट प्रकाश व हवा खेळती राहण्यासाठी केला जातो. केवळ खिडक्यांच्या मदतीनेच डिझायनर एखादं अप्रतिम masterpiece तयार करू शकतो, तेही इमारतीच्या खरी कार्यप्रणालीला बाधा न आणता.

खिडक्यांचे अनियमित मांडणी, दिशानिर्देश (orientation) व उतार (inclinations) केवळ 2D आकारांचा रंजक नमुना तयार करू शकतात, पण त्यातून मूळ उद्देश सफल होतोच असे नाही.

आर्किटेक्टचर केवळ इमारतीबद्दल नाही; ते लोकांबद्दल आहे – जे ती वापरणार आहेत. डिझाइन नेहमी वापरकर्त्यांच्या गरजांचा विचार करून आकार घेतं.

एखाद्या वास्तूच्या प्रवेशद्वाराच्या आत आल्या नंतरच्या लॉबीला जर दुप्पट उंची दिली तर उत्कृष्ट पद्धतीने नैसर्गिक प्रकाश आत येतो यामुळे ती लॉबी वापरणाऱ्यांना सकारात्मक आणि ऊर्जा-पूर्ण वाटते. मग आपसूकच लोक ही जागा नेहमी भरपूर प्रमाणात वापरायला लागतात. त्या जागेत वावर करणारी मंडळी अशा खिडक्यांमधून दिसणाऱ्या दृश्याचा आनंद घेतात, ज्यामुळे या जागेला जीवंतपणा येतो. अशा प्रकारे एका डिझायनरची कल्पना पूर्णत्वाला जाते.

**नैसर्गिक प्रकाशाचा सुंदर झरोका!**

प्रकाश झरोका (Skylights) म्हणजे इमारतीच्या आतील भागात नैसर्गिक प्रकाश खेचून आणणारा घटक. ते इमारतीच्या शिरांप्रमाणे (veins) कार्य करतात. लक्ष केंद्रित केलेल्या भागात पोहोचणाऱ्या प्रकाशाचे प्रमाण हे थेट सुर्यप्रकाशाला समोर असलेल्या क्षेत्रावर अवलंबून असते.

प्रकाशाचा झरोक्याची योग्य प्रकारे केलेली त्याची सजावट एक आरामदायी, सुखद वातावरण निर्माण करते. मोठ्या प्रकाश झरोक्यांवर, toughened glass वर जाणीवपूर्वक अंशतः रंगकाम ही करता येते. यामुळे सावलीसह भरपूर प्रकाश मिळतो. फक्त कोपरे सुर्यप्रकाशाने उजळतील अशा प्रकारे डिझाइन केले की उर्वरित भागात तुलनेने कमी प्रकाश व जास्त आराम मिळतो. अशा मोठ्या आकाराच्या झरोक्यांसाठी Fabricated Structural Grid लागते. त्याच्या प्रमाणबद्ध डिझाइनमुळे भिंतींवर पडणाऱ्या सावल्यांच्या नमुन्यांनी आणखी सौंदर्य वाढते.

एखाद्या इमारतीची अंतर्गत सजावट हा Architecture चा एक भाग आहे. आर्किटेक्चरल पद्धतीने नीट आखलेली व डिझाइन केलेली इमारती बाह्य व आंतरिक अशा दोन्ही ठिकाणी जादुई परिणाम करू शकतात, जे अंतिम वापरकर्त्यांच्या मनावर सकारात्मक परिणाम करतात.

सुर्य प्रकाश सरळ घरात येत असेल तर ते घराच्या आणि घरातील व्यक्तींच्या स्वास्थ्यासाठी उत्तम असते. घरात आरोग्य नांदते, उत्साही वातावरण वृद्धिंगत होते. कोणत्याही बिल्डिंग मध्ये नैसर्गिक हवा आणि प्रकाशयोजना कशी आहे यावर त्या वास्तूची यशस्वीता ठरते. शक्यतो दिवसा दिवा लावावा लागू नये अशी संरचना असावी. अगदीच कॉमन भिंत आहे किंव्हा इमारतीच्या बाजूचे अंतर कमी सोडावे लागत आहे म्हणून प्रकाश आत येण्यास अडथळा येऊ शकतो. खोलीचे माप आणि तिथे असलेल्या खिडक्या यांचे योग्य प्रमाण असावे. छोट्या खिडक्या; मोठ्या खोल्या किंव्हा छोट्या खोल्या; मोठ्या खिडक्या अशा दोन्ही प्रकारात आतील भाग १००% काम करत नाही (जागेची काही विशेष गरज सोडल्यास). केवळ भिंत रिकामी आहे म्हणून मोठ-मोठ्या खिडक्या देणे ते ही अगदी भिंतीच्या मध्यभागी हे चुकीचे ठरू शकते.

आणि म्हणूनच, तुमच्या जागेचे सुयोग्य नियोजन करण्याकरता योग्य प्रोफेशनल निवडा आणि विश्वासाने काम सुपूर्त करा....फायदा तुमचाच आहे.

**– आर्किटेक्ट स्वरूपा कुलकर्णी**, B. Arch
(वास्तुविशारद) Ingenious Design Studio
संपर्क: ९१६८२२२६२२, ७७४३९०९९०९
इ- मेल: ingeniousdstudio@gmail.com
Web-site: www.ingeniousdesigns.in

Ingenious Design studio, Pune
1. Member of AESA, Ahmednagar region
2. Architectural consultant for Guinness World Records
3. Empanelled Architect of PWD Nasik region



Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

## पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेच्या प्रवेश अर्जासाठी २६ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

नगर – इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह प्रवेश उपलब्ध करून देण्यात येतो. तसेच वसतीगृह योजनेपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना अंतर्गत अर्ज ऑनलाइन पद्धतीने मागविण्यासाठी २६ ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पात्र लाभार्थ्यांनी वेळापत्रकानुसार अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विनोद लोंढे यांनी केले आहे.

२ वी नंतर व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर (अबिगर व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शासनाच्या https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर २६ ऑक्टोबर पर्यंत प्रवेशासाठी अर्ज सादर करावेत.

२७ ते ३० ऑक्टोबर दरम्यान अर्जांची छाननी केली जाईल. गुणवत्तेनुसार पहिली निवड यादी ३१ ऑक्टोबर रोजी जाहीर केली जाईल. पहिल्या यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची अंतिम मुदत १० नोव्हेंबर पर्यंत राहील.

रिक्त जागांसाठी प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांपैकी गुणवत्तेनुसार दुसरी निवड यादी १३ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केली जाईल.

दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची अंतिम तारीख २० नोव्हेंबर निश्चित करण्यात आली आहे.

## 'विश्वभारती ॲकॅडमी'च्या महाविद्यालयात जागतिक फार्मासिस्ट दिन साजरा



विश्वभारती ॲकॅडमीच्या औषध निर्माण महाविद्यालयात जागतिक फार्मासिस्ट दिन उत्साहात साजरा झाला.

नगर – विश्वभारती ॲकॅडमीचे औषध निर्माण महाविद्यालयात जागतिक फार्मासिस्ट दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या परिसरात औषधी झाडे लावून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्साहात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अधिष्ठाता प्रा. साखरवाडे होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून ॲकॅडमीचे रजिस्ट्रार गोडगे, डॉ. गणेश जानवे उपस्थित होते. औषध निर्माण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेश शेरकर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना डॉ. महेश शेरकर यांनी औषधनिर्मिती क्षेत्रातील संशोधन, गुणवत्ता आणि समाजसेवेत फार्मासिस्टची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. फार्मासिस्ट हा रुग्ण आणि औषध यामधील दुवा आहे. समाजाच्या आरोग्य व्यवस्थेत त्यांचे स्थान मध्यवर्ती आहे, असे ते म्हणाले.

डॉ. गणेश जाणुळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डी. एस. ए. सिंथेसिसमध्ये फार्मासिस्टला प्रचंड संधी उपलब्ध आहेत. आधुनिक औषध संशोधनात फार्मासिस्टचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे, असे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. साखरवाडे म्हणाल्या, कोविड-१९ सारख्या कठीण परिस्थितीत फार्मासिस्ट समाजासाठी पहिल्या रांगेत उभे राहिले. औषधांच्या उपलब्धतेपासून जनजागृतीपर्यंत त्यांनी केलेली सेवा अमूल्य आहे, असे मत व्यक्त केले.

विद्यार्थी प्रतिनिधी दीपक कोरके आणि तुलसी दायमा यांनी फार्मसी क्षेत्रातील करिअर संधी, समाजसेवा आणि वैद्यकीय क्षेत्रातील जबाबदाऱ्या यावर आपले विचार मांडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गौरी ढमाले यांनी केले तर उपस्थितांनी जागतिक फार्मासिस्ट दिनाच्या उपक्रमाचे कौतुक केले.

## पं.दीनदयाल उपाध्याय जयंती निमित्त स्पर्धांना जिल्ह्यात विक्रमी प्रतिसाद

**विनायक देशमुख यांचे प्रतिपादन; इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निक जिल्हा स्पर्धा**



पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे फित कापून उद्घाटन विनायक देशमुख आदी.

नगर – पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमध्ये जिल्ह्यातील १६००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी विक्रमी संख्येने सहभाग नोंदविला असून अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ही भुषणावह बाब आहे, असे प्रतिपादन पंडित दीनदयाल उपाध्याय एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सवी वर्ष समितीचे सदस्य विनायकराव देशमुख यांनी केले.

पंडित दीनदयाल उपाध्याय जयंती निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या इंजीनियरिंग, पॉलीटेक्निक व फार्मसी महाविद्यालयाच्या गटातील जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन शासकीय तंत्रनिकेतन, अहिल्यानगर येथे करण्यात आले होते. याप्रसंगी श्री. देशमुख बोलत होते.

यावेळी समितीचे सदस्य राजाभाऊ मुळे, शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. अजय आगरकर, परीक्षिका प्रा. शुभांगी कुंभार, प्रा. आश्लेषा भांडारकर, प्रा. सीमा आगरकर इत्यादी उपस्थित होते. प्रारंभी पंडित दीनदयाल उपाध्याय व भारत मातेच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

यावेळी बोलताना श्री. देशमुख म्हणाले, जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाने व पुढाकाराने जिल्ह्यात दीनदयाल उपाध्याय यांचे विचार समाजाच्या विविध स्तरापर्यंत पोचवण्यासाठी मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्यामुळेच जिल्ह्यातील विद्यार्थी विक्रमी संख्येने या उपक्रमांमध्ये सहभागी होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली प्रथम पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यानंतर केलेल्या भाषणात माझे सरकार पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या अंत्योदयाच्या संकल्पनेवर काम करेल अशी ग्वाही दिली होती. त्यानुसार मागील अकरा वर्षात मोदी सरकारने समाजातील सर्वात शेवटच्या घटकाच्या उन्नतीसाठी अनेक क्रांतिकारक योजना राबविल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने उज्वला योजना, घरकुल योजना, आरोग्य विमा योजना, पीएम किसान योजना आदींचा समावेश आहे. या योजना समाजातील गरजू आणि गरीब लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे आणि हेच खरे पंडित दीनदयाल उपाध्याय यांना अभिवादन ठरेल.

राजाभाऊ मुळे बोलताना म्हणाले, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत बालपण गेलेले असतानाही कुशाग्र बुद्धिमत्तेच्या दीनदयाल यांनी आपले आयुष्य राष्ट्राच्या उन्नतीसाठी समर्पित केले. तरुणांनी त्यांचे विचार समजुन घेऊन आपल्या जीवनात त्याचा अंगीकार करावा. या माध्यमातूनच स्वतःची आणि राष्ट्राची प्रगती होईल आणि देश विश्व गुरू बनेल.

प्राचार्य डॉ. अजय आगरकर बोलताना म्हणाले, जिल्ह्यातील ४० पेक्षा जास्त अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने व औषध शास्त्र महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी आज स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. आगामी वर्षभर पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांच्या हिरक महोत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी असाच मोठा सहभाग घ्यावा.

पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीच्या निमित्ताने प्रथम संस्थास्तरावर व आता जिल्हा जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व पोस्टर बनवा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शासकीय तंत्रनिकेतन चे प्रकल्प अधिकारी डॉ. दादा करंजुले यांनी व अन्य सहकार्यांनी परिश्रम घेतले.



अनामप्रेम संस्थेतील खेळाडू कल्पना कदम हिने नवी दिल्ली येथे राष्ट्रीय पातळीवर आयोजित केलेल्या नॅशनल पॅरा योगासन स्पोर्टस् चॅम्पियनशिप स्पर्धेत अंध विभागातून प्रथम क्रमांक मिळवला. तिला या स्पर्धेत गोल्ड मेडल मिळाले आहे.

## नॅशनल पॅरा योगासन स्पोर्टस् चॅम्पियनशिप स्पर्धेत 'अनामप्रेम'च्या कल्पना कदम हिचा प्रथम क्रमांक

नगर – महाराष्ट्र पॅरा योगासन संघाकडून महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणारी अनामप्रेम संस्थेतील खेळाडू कल्पना पंजाबराव कदम हिने नवी दिल्ली येथे राष्ट्रीय पातळीवर आयोजित केलेल्या नॅशनल पॅरा योगासन स्पोर्टस् चॅम्पियनशिप २०२५-२६ या स्पर्धेत अंध विभागातून प्रथम क्रमांक मिळवला. तिला या स्पर्धेत गोल्ड मेडल मिळाले आहे.

कु. कल्पना हि अंधांसाठीच्या पॅरा गोलबॉल या खेळाची देखील राष्ट्रीय खेळाडू असून सन २०२४ मध्ये तिला उत्कृष्ट राष्ट्रीय खेळाडू म्हणून गौरविण्यात आले होते. कल्पनाच्या या यशामागे तिचे अथक प्रयत्न तसेच तिच्या कोच निलिमा म्हस्के व सारिका मॅडम यांचे मार्गदर्शन आहे.

स्नेहालय-अनामप्रेम परिवारातील डॉ. गिरीश कुलकर्णी, इंजि. अजित माने, डॉ. प्रकाश शेठ, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. सायली सतीश सोमण, सीए अशोक पितळे, डॉ. रवींद्र सोमाणी, इंजि. अविनाश बोपर्डीकर, नितीन थाडे, अनिल गावडे, सौ. संगीता सुसर, डॉ. मेघना मराठे, अभय रायकवाड यांनी तिचे अभिनंदन केले.

यावेळी बोलताना डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी सांगितले की अनामप्रेम संस्था अहिल्यानगर, पुणे व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये दिव्यांगांसाठी कार्यरत असून या संस्थेमधील विद्यार्थी दिव्यांगत्व हा अडथळा न मानता शिक्षणासोबतच अनेक क्षेत्रांमध्ये पुढे येत आहेत व करियर करत आहेत.

## महाराष्ट्र राज्य सब-ज्युनियर फुटबॉल प्रशिक्षण शिबिरासाठी अहिल्यानगरच्या खेळाडूंची निवड

**सम्राट आव्हाड व आयुष गाडळकर यांचा समावेश**




नगर – अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या सब-ज्युनियर संघातील खेळाडू सम्राट राजकुमार आव्हाड व आयुष महेंद्र गाडळकर यांची महाराष्ट्र सब-ज्युनियर प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली आहे. हे शिबिर मुंबई येथे ७ ते २६ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे.

ही निवड मे २०२५ मध्ये शिरपूर, धुळे येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरजिल्हा सब-ज्युनियर बॉईज फुटबॉल स्पर्धा २०२४-२५ मधील उल्लेखनीय कामगिरीच्या आधारे झाली आहे. या शिबिरातून अंतिम संघात निवड झालेल्या खेळाडूंना महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार असून, सब-ज्युनियर बॉईज राष्ट्रीय फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२६ अमृतसर, पंजाब येथे २८ ऑक्टोबर पासून आयोजित करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, जोगासिंग मिन्हास, अमरजितसिंग शाही, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव, व्हिक्टर जोसेफ, खजिनदार रिशपालसिंग परमार, सहखजिनदार रणबीरसिंग परमार, राजू पाटोळे, जिल्हा सब-ज्युनियर बॉईज संघ प्रशिक्षक अभिषेक सोनावणे, संघ व्यवस्थापक रोहन कुकरेजा व सर्व पदाधिकारी, सदस्य यांनी सदर खेळाडूंचे अभिनंदन करुन, त्यांना पुढील प्रशिक्षण व स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

मागील वर्षभरात प्रत्येक वयोगटात जिल्ह्यातील खेळाडूंची सातत्याने राष्ट्रीय शिबिरासाठी निवड झाली असून, त्यापैकी ७ खेळाडूंनी अंतिम संघात स्थान मिळवून राष्ट्रीय स्पर्धांमध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले आहे. ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असून, जिल्ह्यातील फुटबॉल खेळाच्या विकासासाठी जिल्हा फुटबॉल संघटना योग्य दिशेने वाटचाल करत असल्याची भावना जिल्हा संघटनेचे सचिव रोनप फर्नांडिस यांनी यावेळी व्यक्त केली.



डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीत डीप लर्निंग विथ पायथन प्रोग्रामिंग कार्यशाळेत पुणे येथील मितू टेक्नॉलॉजीज चे संस्थापक तुषार कुटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. (छाया-विजय मते)

## डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी कॉलेजमध्ये डीप लर्निंग विथ पायथन विषयावर कार्यशाळा

नगर – विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये डीप लर्निंग विथ पायथन प्रोग्रॅमिंग या विषयावर तीन दिवसीय हॅन्ड्स ऑन ट्रेनिंग कार्यशाळा नुकतीच झाली. ही कार्यशाळा माहिती तंत्रज्ञान विभाग आणि संगणक शास्त्र व डिझाईन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे मार्गदर्शन पुणे येथील मितू टेक्नॉलॉजीजचे संस्थापक तुषार कुटे यांनी केले.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांना डीप लर्निंग टेक्नॉलॉजीची मूलभूत माहिती, डीप न्यूरल नेटवर्क्सची रचना व प्रशिक्षण तसेच सी एन एन आणि डीप न्यूल नेटवर्क्समधील प्रगत संकल्पनांची सखोल माहिती देण्यात आली. टेन्सरफ्लो, केरस, पायटॉर्च आदी पॅकेजेसचा अभ्यास, इमेज क्लासिफिकेशन, ऑटोएन्कोडर वापरून अनामोली डिटेकशन, आर एन एन व सी एन एन मॉडेल्सची बांधणी, तसेच ट्रान्सफर लर्निंग वापरून ऑब्जेक्ट डिटेकशन यांसारख्या विषयांवर प्रत्यक्ष प्रात्यक्षिके घेण्यात आली.

या कार्यशाळेसाठी प्रा.प्राची मोरे व प्रा.प्राजक्ता डोलारे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.डी.ए. विधाते, कॉम्पुटर सायन्स चे विभाग प्रमुख डॉ.आर.एस.तांबे, प्राचार्य डॉ.आर.आर.नवथर, तांत्रिक संचालक प्रा.सुनील कल्हापुरे यांचे मार्गदर्शन लाभले.

ही कार्यशाळा विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना डीप लर्निंगच्या आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष अनुभवातून ओळख करून देणारी ठरली. या कार्यशाळेमध्ये एकूण १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले तसेच त्यांनी व्यक्तिगत प्रकल्पही यशस्वीरीत्या पूर्ण केले.

या कार्यशाळेसाठी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डायरेक्टर (टेक्निकल) प्रा.सुनिल कल्हापुरे, सेक्रेटरी जनरल डॉ. पी.एम. गायकवाड, चिफ एक्झीक्युटीव्ह ऑफीसर, डॉ. सुजय विखे पाटील, मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले.



अनाहत एक कलासृष्टी निर्मित आणि संवाद पब्लिसिटी प्रस्तुत अभंगवारी लोगो अनावरण विशाल गणपती मंदिरात करण्यात आले.

# श्री विशाल गणपती मंदिरात अभंगवारी लोगोंचे अनावरण

## अनाहत एक कलासृष्टी निर्मित आणि संवाद पब्लिसिटी प्रस्तुत अभंगवारी महाराष्ट्रात गाजणार

नगर – अहिल्यानगर येथील अनाहत एक कलासृष्टी या संस्थेच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त अभंगवारी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रतिसाद मिळाला. या प्रतिसादानंतर कार्यक्रमाचे दिग्दर्शक प्रा. प्रसाद बेडेकर यांनी या कार्यक्रमाचे प्रयोग महाराष्ट्रात व्हावेत असा मानस व्यक्त केला. त्यानुसार कार्तिकी एकादशी निमित्त साधत अभंगवारी कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये करण्यात येणार आहे. त्याचा लोगो अनावरण सोहळा अहिल्यानगरचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती येथे उद्योजक नरेंद्र फिरोदिया, रवींद्र चिपळूणकर, अजिंक्य सुरवसे, युवराज सर, अभय आगरकर, श्री. खरपूडे, विलास बडवे, चंद्रकांत पंडित, योगेश पंडित, दिलीप पंडित यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या कार्यक्रमात अभिजित अपस्तंभ, ओंकार देऊळगावकर, सौ. अनुजा कुलकर्णी, सौ. अमृता बेडेकर, सौ.रश्मी गंधे, सौ. श्रेया सुवर्णपाठकी हे कलाकार गायन करणार असून सौरभ साठे, आनंद कुलकर्णी, प्रसाद सुवर्णपाठकी, संकेत सुवर्णपाठकी हे कलाकार साथसंगत करणार आहेत. प्रा. प्रसाद बेडेकर या कार्यक्रमाचे निरूपण आणि दिग्दर्शन करणार आहेत. लवकरच कार्यक्रमाच्या तारखा जाहीर केल्या जातील.

उद्योजक नरेंद्र फिरोदिया व रवींद्र चिपळूणकर यांनी हा कार्यक्रम राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर व्हावा अशा अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. अनाहतचे अध्यक्ष प्रसाद सुवर्णपाठकी यांनी आभार मानले.

# नर्सिंग प्रशिक्षणार्थी मुलींना स्टडी टेबल्सचे वाटप

## सेवाप्रीत सोशल फाउंडेशनचा उपक्रम; गरजू कुटुंबातील मुलींना स्वावलंबी करणाऱ्या प्रकल्पाला मदतीचा हात



सेवाप्रीत सोशल फाउंडेशनतर्फे आयडियल हेल्पिंग हॅण्ड संचलित नर्सिंग प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी मुलींना स्टडी टेबल्स भेट देण्यात आले.

नगर – सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने आयडियल हेल्पिंग हॅण्ड संचलित नर्सिंग प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी मुलींना स्टडी टेबल्स भेट देण्यात आले. तारकपूर येथील बिशप हाऊस परिसरात हे प्रशिक्षण केंद्र चालविले जाते. समाजातील गरजू व स्लम भागातील मुलींना स्वावलंबी करण्यासाठी या केंद्रात नर्सिंगचे प्रशिक्षण दिले जात आहे.

या मुलींच्या शिक्षणात व अभ्यासात आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे ही वेळेची गरज असल्याचे लक्षात घेऊन सेवाप्रीत सोशल फाउंडेशनने टेबल्सची मदत केली. या उपक्रमामुळे प्रशिक्षणार्थी मुलींच्या चेहऱ्यावर देखील आनंद निर्माण झाले होते.

कार्यक्रमाला सेवाप्रीत फाउंडेशनच्या संस्थापिका जागृती ओबेरॉय, प्रकल्प प्रमुख अन्नू थापर, अर्चना गणेश खंडेलवाल, अनीता मंत्री, सविता बोरा, निलीमा शाह, पूजा बजाज, नेहा भगवानी, पल्लवी रेनाविकार, विनिता छाब्रिया, साक्षी कपूर, अस्मी भगत, दिशा झालानी, राखी चंदे, रश्मी आर्डे, अर्चना पुगलिया, मनीषा थापर, दक्षा मुनोत यांच्यासह आयडियल हेल्पिंग हॅण्डचे निर्मला केदारी, शिवाजी जाधव, संगीता साळवी उपस्थित होते.

निर्मला केदारी यांनी माहिती देताना सांगितले की, आयडियल हेल्पिंग हॅण्ड ही संस्था गेल्या पाच वर्षांपासून समाजातील अतिशय दुर्लक्षित व गरजू मुला-मुलींसाठी स्वावलंबनाचे कार्य करत आहे. विशेषतः नर्सिंग क्षेत्रातील मुलींना शिक्षणासाठी लागणारे साहित्य, मार्गदर्शन आणि आधार देण्याचे कार्य संस्थेच्या वतीने करुन त्यांना आत्मनिर्भर केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

जागृती ओबेरॉय म्हणाल्या की, महिला आत्मनिर्भर होणे ही काळाची गरज आहे. केवळ साक्षर होणे पुरेसे नाही, तर कौशल्यपूर्ण शिक्षण घेणे आवश्यक आहे. नर्सिंग हे क्षेत्र केवळ रोजगारच नाही तर सेवाभावाची खरी ओळख करून देते. त्यामुळे या प्रशिक्षण केंद्रातून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक मुलींना उज्वल भविष्य मिळणार आहे. सेवाप्रीत सोशल फाउंडेशन समाजातील प्रत्येक दुर्लक्षित घटकाला शिक्षण आणि संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनाने कार्य करत आहे. गरजू व दिव्यांग मुलांच्या शिक्षणासाठी कार्य सुरु असून, आज आयडियल हेल्पिंग हॅण्डच्या प्रकल्पाला मदत करण्यात आली आहे. महिला आत्मनिर्भर झाल्या की कुटुंब, समाज आणि देश सक्षम होतो. म्हणूनच महिलांनी कौशल्य आत्मसात करुन आत्मनिर्भर होण्याचे त्यांनी आवाहन केले.

अन्नू थापर म्हणाल्या की, आजच्या युगात महिलांना फक्त घरापुरते मर्यादित न राहता शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या तिन्ही क्षेत्रात सक्षम होणे आवश्यक आहे. सेवाप्रीत सोशल फाउंडेशनकडून महिलांच्या आत्मनिर्भरतेसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. नर्सिंग प्रशिक्षण घेत असलेल्या या मुली उद्या समाजातील रुग्णांची सेवा करतील, कुटुंबाची जबाबदारी सांभाळतील आणि स्वतःच्या पायावर उभे राहतील. महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी सेवाप्रीत देखील प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमासाठी कविता खंडेलवाल, रितू अग्रवाल, दीपा जाग्गी, मनीषा चुग, अर्चना खंडेलवाल, चंदा खंडेलवाल, लता खंडेलवाल, कृतिका बजाज, अभिलाषा नवंदर, रीना मनियार, हर्षिता बागचंदानी, सपना दर्डा, नीतू आहुजा, वैशाली दगडे, गायत्री लोंढे आदी सेवाप्रीतच्या सदस्यांचे सहकार्य लाभले. आयडियल हेल्पिंग हॅण्डतर्फे देण्यात आलेल्या मदतीबद्दल सेवाप्रीतचे आभार मानण्यात आले.

## ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी वसतीगृहात प्रवेशासाठी संपर्क साधावा

नगर – सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत ५ वी पदवीपर्यंतच्या ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी शेवगाव येथे प्रत्येकी १०० क्षमतेचे दोन शासकीय वसतीगृह मंजूर असून प्रवेशासाठी वसतीगृहाशी संपर्क साधण्याचे आवाहन गृहपाल बाळासाहेब बडे यांनी केले आहे.

वसतीगृहात प्रवेशासाठी निकालपत्रक, जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, पालकाचा ग्राम सेवकाकडील ऊसतोड कामगार असल्याबाबत दाखला आदी कागदपत्रांसह प्रवेश अर्ज करावेत. मुलांच्या वसतीगृहाबाबतच्या अधिक माहितीसाठी ९४२१४७९११७ व मुलींच्या वसतीगृहात प्रवेशासाठी ९९७५७५४२०८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# महार रेजिमेंट स्थापना दिनाच्या कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष राजू शिंदे यांचा गौरव



यश सिद्धी सैनिक सेवा संघाच्या वतीने ८५ व्या महार रेजिमेंट स्थापना दिन बुलढाणा येथे उत्साहात साजरा करण्यात आला. या राज्यव्यापी मेळाव्यात या सोहळ्यात यश सिद्धी सैनिक सेवा संघ, अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष व बहुजन समाज पार्टीचे जिल्हा महासचिव राजू शिंदे यांचा सामाजिक कार्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला.

नगर – यश सिद्धी सैनिक सेवा संघाच्या वतीने ८५ व्या महार रेजिमेंट स्थापना दिन बुलढाणा येथे उत्साहात साजरा करण्यात आला. या राज्यव्यापी मेळाव्यात या सोहळ्यात यश सिद्धी सैनिक सेवा संघ, अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष व बहुजन समाज पार्टीचे जिल्हा महासचिव राजू शिंदे यांचा सामाजिक कार्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला.

आमदार संजय गायकवाड, कर्नल सुहास जतकर व सिद्धी सेवा संघाचे अध्यक्ष अनिल डोंगरदिव यांच्या हस्ते शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास प्रा. डॉ. अस्मिता मनवर, सेवा संघाचे सचिव चंद्रकांत खरात, प्रा. शायना पठाण, सुभेदार मेजर त्र्यंबक इंगळे, सुनील सुरडकर, राजू पवार, बाजीराव गवळी, शंकर हिवाळे आदींसह महाराष्ट्रातील सर्व आजी-माजी सैनिक उपस्थित होते.

यावेळी विविध सांस्कृतिक, वैचारिक व प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यश सिद्धी सैनिक सेवा संघ दरवर्षी महार रेजिमेंट स्थापना दिनाला स्वाभिमान सोहळा म्हणून साजरा केला जातो. यामध्ये शौर्यगाथा सांगणारे सांस्कृतिक कार्यक्रम, विचारमंथन, शहीद कुटुंबीयांचा गौरव आणि युद्धवीरांच्या मिरवणुकीद्वारे देशभक्तीचा जागर करण्यात आला. महार रेजिमेंटचा शौर्यमयी इतिहास व भारतीय सेनेतील योगदान याचा प्रचारप्रसार आणि शहीदांचे स्मरण हा या सोहळ्याचा मुख्य उद्देश होता.

राजू शिंदे म्हणाले की, आजचा दिवस हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा आहे. महार रेजिमेंटने आपल्या अदम्य शौर्य, शिस्त व पराक्रमाने भारतीय लष्करात ठसा उमटवला आहे. देशासाठी रक्त सांडणाऱ्या शहीदांचा आपण जितका गौरव करू तितका कमीच आहे. सैनिक म्हणजे फक्त सीमारेषेवर उभा राहणारा नाही, तर तो समाजातील प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणादायी आदर्श असतो. यश सिद्धी सैनिक सेवा संघाने गेली अनेक वर्षे या दिवशी स्वाभिमान सोहळा साजरा करून सैनिकांचा गौरव आणि शौर्यकथा पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले असल्याचे त्यांनी सांगितले. तर हा सन्मान हा केवळ माझा नाही, तर अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक कार्यकर्त्याचा, समाजातील प्रत्येक सैनिकाचा असल्याचे ते म्हणाले.

# भिंगार छावणी परिषदेत स्वच्छता ही सेवा अभियानाचा समारोप

## महात्मा गांधी-माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी



भिंगार छावणी परिषदेत राष्ट्रपिता महात्मा गांधीजी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली.

नगर – भिंगार छावणी परिषदेत राष्ट्रपिता महात्मा गांधीजी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाद्वारे स्वच्छता ही सेवा या अभियानाचा समारोप करण्यात आला.

१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत छावणी क्षेत्र स्वच्छ सुंदर करण्यासाठी नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. शहर स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी छावणी परिषदेच्या माध्यमातून नागरिकांच्या सहकार्याने आम्ही वचनबद्ध राहू असे मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांनी सांगितले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ इतिहास अभ्यासक भुषण देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, मनोनित सदस्य वसंत राठोड, स्वच्छता निरीक्षक रमेश साके, सुनिल शिंदे, गणेश भोर, स्नेहा पारनाईक, डॉ. गीतांजली पवार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान गांधीजी व शास्त्रीजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविलेल्या शालेय विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी या प्रसंगी स्वच्छता अभियान गीत सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. यावेळी स्वच्छता कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करून त्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. मोहिमेच्या यशस्वीतेसाठी योगदान देणाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांनी म्हणाले की, स्वच्छता ही सेवा केवळ एक मोहिम नाही, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. महात्मा गांधींच्या विचारांचे अनुसरण करत, आपण समाजातील प्रत्येक भागात स्वच्छता पसरवली पाहिजे. आज विद्यार्थी, कर्मचारी आणि नागरिकांनी दिलेल्या योगदानामुळे ही मोहीम यशस्वी झाली आहे. त्यांचा प्रयत्न आदर्श म्हणून इतरांसाठी प्रेरणादायी ठरेल. शहर स्वच्छ आणि सुंदर बनविण्यासाठी छावणी परिषद सर्वतोपरी प्रयत्न करत आहे आणि यापुढेही समाजातील प्रत्येक घटकाला सहभागी करून मोहीम आणखी प्रभावी करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

भूषण देशमुख यांनी स्वच्छता कर्मचारी यांचे योगदान समाजासाठी प्रेरणादायी आहे. स्वच्छ, निरोगी आणि सुंदर भारताच्या निर्मितीत ते महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमातून स्वच्छतेचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक संजय शिंदे, ठेकेदार राजेश काळे, विभागीय अभियंता अशोक फुलसौंदर, भांडारपाल योगेश बोरुडे, संगणक अभियंता धनश्री शहा, वरिष्ठ राजस्व लिपिक शिशिर पाटसकर तसेच छावणी परिषदेतील शाळेतील कर्मचारी, परिवहन, पीडब्ल्यूडी, सर्व सफाई कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.



राजस्थानी रंगरेज मुस्लिम बिरादरी महाराष्ट्र, कर्नाटक व तामिळनाडू या राज्यांचे उपाध्यक्षपदी फारूक रंगरेज यांची निवड झाल्याबद्दल त्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन उत्साहात करण्यात आले.

# राजस्थानी रंगरेज मुस्लिम बिरादरीची कार्यकारणी जाहीर

## अध्यक्षपदी जावेद रंगरेज, कार्याध्यक्षपदी मिनाज रंगरेज, मीरा शफी रंगरेज खजिनदार तर इनामूलहक रंगरेज सचिव

नगर – राजस्थानी रंगरेज मुस्लिम बिरादरी महाराष्ट्र, कर्नाटक व तामिळनाडू या राज्यांचे उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे फारूक रंगरेज यांची निवड झाल्याबद्दल त्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

या वेळी अहिल्यानगर शहर कार्यकारणीचीही घोषणा करण्यात आली. अध्यक्षपदी जावेद गुलाम मोहम्मद रंगरेज, कार्याध्यक्षपदी मिनाज मोहम्मद इम्तियास रंगरेज उर्फ बबलू रंगरेज, खजिनदारपदी मीरा मोहम्मद शफी रंगरेज, तर सचिवपदी इनामउल्हाक गुलाम अहमद रंगरेज यांची निवड करण्यात आली.

ज्येष्ठ मार्गदर्शक म्हणून हाजी शफी रंगरेज, इम्तियाज अहमद रंगरेज, गुलाम अहमद रंगरेज, जुनेद अब्दुल वाईद रंगरेज, लतीफ रंगरेज यांनी मार्गदर्शनाची जबाबदारी स्वीकारली.

कार्यकारणी सदस्य म्हणून शोहेब जुनेद रंगरेज, फरान मोहम्मद फारूक रंगरेज, फैज मोहम्मद फारूक रंगरेज, इरफान हाजी उसमान रंगरेज, फिरोज नूर मोहम्मद रंगरेज, मुदस्सिर अब्दुल वाईद रंगरेज, सरफराज अब्दुल सत्तार रंगरेज, इरफान सलीम रंगरेज आणि हाशिम अब्दुल लतीफ रंगरेज यांचा समावेश करण्यात आला.

बैठकीत रंगरेज बिरादरीच्या प्रगतीसाठी शिक्षण क्षेत्रात उपक्रम राबवणे, रंगरेज भवन उभारणे तसेच पुढील पिढीसाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्याचा संकल्प करण्यात आला. बैठक हाजी शफी रंगरेज यांच्या निवासस्थानी पार पडली.



अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या वतीने उत्कृष्ट कार्य केलेल्या प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर आदी. (छाया – सागर इंगळे)

# जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचा दसरा महोत्सव साजरा

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचा दसरा महोत्सव उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालयांतर्फे अतिवृष्टी व पुरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये मदत रक्कम जमा करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली.

या निमित्ताने संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे म्हणाले, जिल्हा मराठा संस्थेची उभारणीमध्ये चौथे छत्रपती शिवाजी महाराजांनी रुजविलेल्या समाजधर्माची परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न आहे. दिवंगत संस्थापक पदाधिकाऱ्यांच्या स्मृती जपण्याचा व त्यांच्या कार्याला पुढे नेण्याचा हा महोत्सव एक मार्ग आहे.

यावेळी उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे-पाटील, विश्वस्त जी. डी. खानदेशे, नंदकुमार झावरे, मुकेश मुळे, सिताराम खिलारी, जयंत वाघ, चंद्रराव मोरे आदी उपस्थित होते.

अध्यक्ष दरे पुढे म्हणाले, शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी हेच संस्थेचा आत्मा आहेत. सर्वांच्या सहकार्यानेच आपण राज्यात शिक्षण क्षेत्रात अग्रेसर राहिलो आहोत. आमचा भर नेहमीच कृतीवर असतो, केवळ बोलण्यावर नाही. या महोत्सवात राष्ट्रीय, राज्य व जिल्हा पातळीवर उल्लेखनीय यश मिळविलेल्या तसेच विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा सत्कार पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमात जयंत वाघ, नंदकुमार झावरे, ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, सिताराम खिलारी यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक विजयकुमार पोकळे यांनी केले. कार्यक्रमाचा अहवाल मुकेश मुळे यांनी सादर केला. सूत्रसंचालन रवींद्र देठे यांनी केले. प्राचार्य बी.बी. सागडे यांनी आभार मानले.

# महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत उत्साहात



सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी झाली.

नगर – मुकुंदनगर येथील मोहंमदीया एज्युकेशन सोसायटीच्या सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत महात्मा गांधीजी आणि लाल बहादूर शास्त्रीजी यांची जयंती साजरी करण्यात आली.


याप्रसंगी मुख्याध्यापक नौशाद सय्यद यांच्या अध्यक्षतेखाली एक सन्माननीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षीय भाषणात त्यांनी महात्मा गांधीजी आणि लाल बहादूर शास्त्रीजींच्या जीवनाचे आणि संघर्षाचे स्मरण केले. आणि सांगितले की यशाचे रहस्य केवळ कठोर परिश्रमात आहे. आणि विद्यार्थी काळात विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी खोलवरचे नाते राखणे महत्वाचे आहे. जेणेकरून ते भविष्यात त्यांची ओळख उजळवू शकतील. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्साही पद्धतीने भाषणे दिली. असलम पटेल यांनी महात्मा गांधीजींच्या जीवनावर आपले विचार व्यक्त केले. सुलताना शेख यांनी गांधीजींच्या सत्यता आणि शांततावादावर प्रकाश टाकला.

शेख फरजाना यांनी गांधीजी आणि स्वातंत्र्य चळवळीवर प्रकाश टाकला. तर शाहीन शेख यांनी लाल बहादूर शास्त्रीजींच्या साध्या पण महान व्यक्तिमत्त्वाबद्दल माहिती दिली. शेख हीना यांनी आभार मानले.

या यशस्वी कार्यक्रमात शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यावेळी पठाण फरहान उज़मा, यास्मिन शेख, हीना शेख, शाहीन शेख, फरजाना शेख, असलम पटेल उपस्थित होते.




## सौख्यप्रद सहजीवन



विचारा प्रश्न

प्रश्न : मी ३० वर्षांचा तरुण आहे. मला सतराव्या वर्षापासूनच मद्यपानाची सवय लागली. सुरुवातीला मित्रांच्या नादानं मी यात गुंतलो. पुढे इंजिनिअर झाल्यानंतर मी एका मल्टिनॅशनल कंपनीत काम करू लागलो. आमच्या कंपनीत नियमितपणे पार्ट्या होतात. कधी कधी अतिकामानंतर मित्रांबरोबर बिअर किंवा व्हिस्की घ्यायची सवय लागली आहे. मला आम्लपित्ताचा त्रास आहे. शिवाय महिन्याभरापूर्वीच मला मधुमेह झाल्याचं डॉक्टरांनी सांगितलं आहे. इतक्या वर्षांची मद्यपानाची सवय मी कशी काय सोडवू शकेन, मधुमेह पूर्ण बरा होऊ शकतो का या निदानानं मी घाबरून गेलो आहे. माझं लग्नही ठरलं आहे. मी लग्न करावं का?

**उत्तर** : तुमच्या एकाच प्रश्नात असलेल्या अनेक प्रश्नांची आपण क्रमाक्रमानं उत्तरं पाहू या. पहिली महत्त्वाची बाब म्हणजे तुम्ही मद्यपानाची सवय आहे असं म्हणता. ही सवय नव्हे; व्यसन आहे हे मान्य करा. सतराव्या वर्षापासून तुम्ही या व्यसनाकडे वळलात, ही चूक तुम्ही इच्छा असेल तर नक्कीच दुरुस्त करू शकता. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या व्यसनासाठी मित्र नव्हेत तर आपण स्वतःच जबाबदार आहोत हे तुम्ही लक्षात घेतलंच पाहिजे. त्यांना नकार द्यायला शिका. ठरावीक वेळी तुम्हालाही बिअर किंवा व्हिस्की प्यावीशी वाटली तर त्याऐवजी चहासारखं सौम्य पेय घ्या. हळूहळू त्यांच्यापासून लिंबू सरबत किंवा लिंबू पाण्यापर्यंत या. तेलकट, तिखट पदार्थांपासून फळांकडे वळा. समुपदेशकांची मदत घ्या. न लाजता व्यसनमुक्ती केंद्रातही जा. आम्लपित्त आणि मधुमेहाबरोबरच इतर आजारांनी डोकं वर काढू नये म्हणून वेळीच सावध व्हा.

मधुमेह पूर्ण बरा करण्यासाठी औषध नाही परंतु आहार, विहार आणि व्यायाम यांची पथ्यं पाळून तुम्ही तो नक्कीच आटोक्यात ठेवू शकता.

## पायामधली जळजळ दुर्लक्षू नका



आरोग्यवेध
डॉ. महेश दळे

पायांमध्ये वेदना आणि जळजळ या समस्येचा त्रास असेल, तर हलक्यात घेऊ नका. बरेच लोक वैद्यकीय तपासणी न करता या त्रासाला सामान्य थकवा किंवा अशक्तपणा मानतात; परंतु पायांमध्ये सतत जळजळ किंवा वेदना होणे हेदेखील कोणत्याही गंभीर आजाराचे लक्षण असू शकते. पायांमध्ये जळजळ किंवा वेदना होण्याची अनेक कारणे असू शकतात, म्हणून योग्य कारण समजून घेणे महत्त्वाचे आहे. पूर्वी, वृद्ध लोक पायांमध्ये या वेदनांची तक्रार करायचे; परंतु आता ही समस्या तरुणांमध्येही आढळत आहे. ४० ते ५० वयोगटातील लोकही पाय दुखत असल्याची तक्रार करत आहेत. कधी ते व्हिटॅमिन सीच्या कमतरतेमुळे असते, तर कधी खेळाडूंच्या पायामुळे किंवा काही अंतर्गत दुखापतीमुळे असते. मधुमेहदेखील पायात वेदना आणि जळजळ होण्याचे कारण असू शकते. मधुमेह बराच काळ नियंत्रित केला नाही, तर त्याचा नसांवर परिणाम होऊ लागतो. शरीरातील रक्तातील साखरेची पातळी वाढते, तेव्हा नसांमध्ये सूज येऊ लागते आणि हळूहळू मज्जातंतूंचे नुकसान सुरू होते. त्याला 'न्यूरोपॅथी' म्हणतात. यामध्ये पायात जळजळ, मुंग्या येणे, बधीर होणे किंवा वेदना होतात. मधुमेहाच्या रुग्णांच्या लहान नसांमध्ये त्याची लक्षणे प्रथम दिसून येतात. सर्वात आधी लहान नसांमध्ये वेदना आणि जळजळ सुरू होते. ते वेळीच नियंत्रित न केल्यास पायांमध्ये जखमा, संसर्ग आणि अल्सर होऊ शकतात. आहारात व्हिटॅमिन सीची कमतरता असते, तेव्हा नसांवर परिणाम होऊ लागतो. यामुळे नसा कमकुवत होतात. याशिवाय, व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे नसा कमकुवत होतात आणि त्यामुळे पायांमध्ये सुन्नपणा आणि मुंग्या येणे जाणवते. पायांच्या नसांमध्ये रक्त व्यवस्थित वाहत नाही, तेव्हा नसा फुगतात. कारण कधी कधी एकाच ठिकाणी रक्ताची गुठळी तयार होते. यामुळे नसा फुगतात आणि पायांमध्ये सूज येऊन तीव्र वेदना होतात. कधी कधी सायटिकामुळेदेखील पायांमध्ये वेदना होतात. यामध्ये पाठीच्या कण्यातून बाहेर पडणाऱ्या नसांवर भार वाढतो आणि पायांपर्यंतच्या नसांवर परिणाम होतो. त्यामुळे वेदना आणि जळजळ वाढते. बुरशीजन्य संसर्ग, खेळाडूंच्या पायाची जळजळ किंवा ॲलर्जीमुळेदेखील पायात जळजळ होऊ शकते.

**प्रतिबंधात्मक उपाय**

* मधुमेह असेल तर रक्तातील साखर नियंत्रणात ठेवा
* जीवनसत्त्वांनी समृद्ध संतुलित आहार घ्या
* आरामदायक आणि सुती मोजे आणि शूज घाला
* रक्ताभिसरण चांगले राहावे म्हणून दररोज हलका व्यायाम करा
* धूम्रपान आणि मद्यपान टाळा. कारण ते नसा अधिक कमकुवत करतात.


## आता दातात लस देणार



नवतंत्रज्ञान
डॉ. अंजिक्य बोऱ्हाडे

लस देण्यासाठी सुईचा वापर केला जातो. सुई, इंजेक्शनमुळे वेदना होतात; पण अलीकडील एका शोधामुळे ही विचारसरणी बदलली आहे. टेक्सास टेक युनिव्हर्सिटीचे एस.जे. इंग्रोल आणि नॉर्थ कॅरोलिना स्टेट युनिव्हर्सिटीचे अभियंता हरविंदर गिल यांनी एक अनोखा मार्ग शोधला आहे. तो म्हणजे फ्लॉस (दंत फ्लॉस) म्हणजेच दात स्वच्छ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या धाग्याद्वारे लस देणे. संशोधकांना आढळून आले की 'जिन्जिव्हल सल्कस' म्हणून ओळखल्या जाणारा दात आणि हिरड्यांमधील लहान भाग हे लस देण्यासाठी सर्वोत्तम ठिकाण आहे. संशोधनात उंदरांना एका विशेष प्रकारच्या फ्लॉसने लस देण्यात आली, तेव्हा त्याचे निकाल आश्चर्यकारक होते. फ्लॉसची लस देण्यात आलेल्या उंदरांनी जास्त अँटीबॉडीज तयार केल्या. ते प्राणघातक फ्लूपासूनही वाचले. त्यांची रोगप्रतिकारक शक्ती सक्रिय झाली. संशोधकांनी २७ स्वयंसेवकांवर चाचणी केली. त्यात लसीऐवजी फ्लॉसवर फूड डाय लावण्यात आला. सुमारे ६० टक्के फूड डाय हिरड्यांच्या योग्य ठिकाणी पोहोचला. यावरून सिद्ध झाले, की ही पद्धत मानवांमध्येही यशस्वी होऊ शकते. यामुळे आता लसीसाठी सुईची गरज भासणार नाही. फ्लॉसवर लेपित केलेली लस थंड ठेवण्याची गरज भासणार नाही. ती पोस्टाने पाठवता येईल आणि लोक ती स्वतः सहजपणे वापरू शकतील. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यामुळे वेदना होणार नाहीत. प्रत्येक वेळी लस योग्य डोसमध्ये दिली पाहिजे. लहान मुलांवर (ज्यांच्या हिरड्या निरोगी नाहीत) ती वेगळ्या पद्धतीने वापरली पाहिजे.

## हातापायात वेदना? मज्जातंतू तपासा!



नवसंशोधन
डॉ. दिलीप शिरसाट

पाय किंवा हातात मुंग्या येणे, बधीर होणे किंवा तीक्ष्ण धक्क्यासारखी वेदना होत असल्यास लोक सामान्यत: थकवा किंवा अशक्तपणा समजून दुर्लक्ष करतात; परंतु ही लक्षणे मज्जातंतूंच्या नुकसानाची (न्यूरोपॅथी) असू शकतात. अलीकडेच 'जर्नल ऑफ न्यूरोलॉजी'मध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनात हा धक्कादायक खुलासा झाला आहे. अमेरिकेतील मिशिगन येथे १६९ लोकांवर एक अभ्यास करण्यात आला. म्हणजेच, केवळ साखरच नाही तर वजन वाढणे, रक्तदाब यासारख्या समस्यादेखील नसा कमकुवत करू शकतात.

रुग्णांचे सरासरी वय ५८ वर्षे होते आणि सुमारे ७० टक्के लोक या आजाराने त्रस्त होते. सुमारे अर्ध्या रुग्णांना मधुमेह होता आणि उर्वरित लोकांना उच्च रक्तदाब, पोटाची चरबी, उच्च रक्तातील साखर आणि खराब कोलेस्ट्रॉल सारखे चयापचय सिंड्रोम होते. सुमारे ६० टक्के रुग्णांना सतत वेदना (क्रॉनिक पेन) होत होत्या. प्रत्येक तिसऱ्या रुग्णाने सांगितले, की ते वेदनेसारखे वाटते. या आजारामुळे पडणे, संसर्ग होऊ शकतो. एवढेच नाही, तर न्यूरोपॅथीमुळे नैराश्य आणि अकाली मृत्यूचा धोकाही वाढतो. आतापर्यंत मानले जात होते, की मधुमेहामुळे न्यूरोपॅथीशी संबंधित समस्या जडतात. परंतु संशोधनातून दिसून आले आहे, की मेटाबॉलिक सिंड्रोम असलेल्या लोकांमध्येदेखील या आजाराची शक्यता चार पट जास्त असते.

अभ्यासात उत्पन्न आणि वंश यांच्यातील संबंधदेखील तपासले गेले. त्यानंतर उत्पन्नाचा परिणाम आढळला नाही.

आश्चर्याची बाब म्हणजे, इतरांपेक्षा कृष्णवर्णीय लोकसंख्येत न्यूरोपॅथीचा धोका थोडा कमी असल्याचे आढळून आले. अभ्यासाच्या प्रमुख संशोधक डॉ. मेलिसा ए. एलाफ्रोस यांच्या मते, न्यूरोपॅथीचा वेळेवर शोध घेणे आणि त्यावर उपचार करणे खूप महत्वाचे आहे. हा आजार केवळ जीवनाची गुणवत्ता कमी करत नाही, तर मृत्यूचा धोकादेखील वाढवतो. या अभ्यासातून पाय आणि हातांमध्ये मज्जातंतू दुखणे ही हलक्यात घेण्यासारखी गोष्ट नाही, हे स्पष्टपणे दिसून येते. सुन्नपणा, मुंग्या येणे किंवा सतत वेदना होत असल्यास दुर्लक्ष करू नये. वेळेवर झालेले निदान आणि नेमके उपचार या व्याधीमध्ये गंभीर गुंतागुंत टाळू शकतात.

## खाज असू शकते आजाराचे लक्षण



व्याधी विचार
डॉ. रमेश कोठारी

बऱ्याचदा लोकांना पायांना खाज येण्याची समस्या असते. कधी कधी ही खाज काही वेळात बरी होते; परंतु कधी कधी ती कायम राहते आणि त्रास वाढवते. लोक अनेकदा खाज सुटणे हा किरकोळ त्रास समजून दुर्लक्ष करतात; परंतु त्यामागे अनेक गंभीर कारणे असू शकतात. पायांना खाज येणे ही केवळ त्वचेची समस्या नाही, तर शरीराच्या अंतर्गत आरोग्याशी संबंधित एक लक्षणदेखील असू शकते. पायांना खाज येण्याचे सर्वात सामान्य कारण म्हणजे बुरशीजन्य संसर्ग. याला 'ॲथलीट फूट' असेही म्हणतात. घाम आणि घाणीमुळे ही समस्या जास्त होते. जास्त वेळ ओले मोजे घालणे किंवा पायांच्या स्वच्छतेची काळजी न घेतल्याने ही समस्या वाढते. मधुमेह असलेल्या लोकांना पायांना खाज येणे सामान्य आहे. मधुमेहामुळे त्वचा कोरडी होते आणि रक्ताभिसरण प्रभावित होते. यामुळे पायात जळजळ, खाज सुटणे आणि कधी कधी जखमा होऊ शकतात. ॲलर्जीची समस्या कधी कधी साबण, डिटर्जंट, शूज किंवा एखाद्या विशिष्ट पदार्थाच्या ॲलर्जीमुळेही खाज येऊ शकते. खाज सुटण्यासोबतच लाल पुरळ किंवा सूज येत असेल, तर तुमच्या त्वचेला एखाद्या गोष्टीची ॲलर्जी असल्याचे स्पष्ट लक्षण आहे.

हिवाळ्यात किंवा खूप गरम पाण्याने पाय धुण्यामुळे त्वचा कोरडी होते. कोरड्या त्वचेत ओलावा नसल्याने खाज वाढते. अशा परिस्थितीत मॉइश्चरायझर किंवा तेलाने मसाज करून आराम मिळू शकतो. तणाव आणि मानसिक दबावाचाही शरीरावर परिणाम होतो. बऱ्याच वेळा जास्त ताण घेतल्याने त्वचेत खाज सुटते किंवा जळजळ सुरू होते. याला 'सायकोसोमॅटिक इचिंग' म्हणतात. पायांना खाज सुटण्यापासून रोखण्याचे मार्ग म्हणजे पाय नियमितपणे स्वच्छ करणे. दररोज मोजे बदला आणि ओले शूज घालणे टाळा. मॉइश्चरायझर किंवा नारळाच्या तेलाने मसाज करा. ॲलर्जी असेल तर ती वाढवू शकणाऱ्या संदिग्ध वस्तूंचा वापर ताबडतोब थांबवावा. समस्या वाढल्यास त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. पायांना खाज सुटणे अनेक कारणांमुळे होऊ शकते. बुरशीजन्य संसर्ग असो, मधुमेह असो, ॲलर्जी असो किंवा कोरडी त्वचा; ते हलके घेणे योग्य नाही. खाज बराच काळ टिकत राहिली किंवा खूप वाढत असेल तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## अल्सर सतावतोय?




डॉ. योगेश पोटे

अनेकांना पोटातील अल्सरची समस्या भेडसावते. या अल्सरमुळे पोटात तीव्र वेदना जाणवतात. बरेचदा रुग्णाच्या पोटात घट्टे पडतात. त्यात संसर्ग होऊन बॅक्टेरिया वाढतात. वेळीच लक्ष दिलं नाही तर ही एक गंभीर समस्या बनते. म्हणूनच पोटाचा अल्सर नेमका कशामुळे होतो हे जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करायला हवी.

* आहारात नियमितपणे मसालेदार पदार्थांचा समावेश असेल तर अधिक प्रमाणात ॲसिडची निर्मिती होते आणि अल्सरची समस्या उद्भवते.
* धूम्रपानाच्या व्यसनामुळे शरीरात घातक रसायनांची निर्मिती होते. ते पोटात गेल्यास अल्सर होऊ शकतो.
* बरेचदा अन्नातून अथवा पाण्यातून पायलोरी नामक बॅक्टेरिया शरीरात प्रवेश करतात. त्यांच्यामुळेही अल्सरची समस्या उत्पन्न होते.
* सतत ताण असल्यासही पोटातील अल्सरचा धोका बळावतो.
* सध्या वेदनाशामकं घेण्याचं प्रमाण वाढलं आहे. पण या औषधांच्या अतिरेकानेही पोटातील अल्सरचा धोका बळावतो.

## व्यायाम टाळताय?



आपण कुठे चुकतो

सकाळी उठल्यानंतर पहिल्यांदा बाहेर सूर्योदय किंवा प्रसन्न सकाळ न पाहता अनेकदा आपल्या मनात दिवसभराच्या कामाचा विचार येतो. संपूर्ण दिवस कामानं भरलेला असल्याचं जाणवतं आणि मग पुढच्या दिवसाच्या कल्पनेनंच आपण कामं करण्याआधी शिणून जातो. मग वाटतं, या सगळ्या धबडग्यात व्यायामाला कुठून वेळ आणणार? आज राहू दे, बघू उद्यापासून वगैरे... आता खरी चूक या विचारातच दडलेली असते. उद्याचा दिवस असाच असणार हे आपल्याला कुठे तरी नक्कीच माहीत असतं. परंतु तरीही आपल्या अंतर्मनानं व्यायाम टाळण्याची शोधून काढलेली ही युक्ती असते. तसं पाहता ज्याला खरोखरच आरोग्याची काळजी घ्यायची असते, तो व्यायाम करतोच. मग तो कुठेही असो. त्याला तेवढा वेळ काढता येतो. निदान दिवसभराचं काम संपल्यावर आणि रात्रीचं जेवण झाल्यावर तरी तासभर फिरून येता येतं. परंतु त्यावेळी दिवसभराच्या कामाचा डोंगर समोर उभा राहतो आणि आता झोप किंवा टीव्ही पाहणं हाच विश्रांतीचा एकमेव मार्ग असल्यासारखं वाटू लागतं. वास्तविक, यातील टीव्ही पाहणं हे मनोरंजन आहे. ते आवश्यक नाही असं नाही; व्यायामाएवढं ते आवश्यक नसतं. परंतु, आपण त्यासाठी वेळ काढतो. पण व्यायाम किंवा फिरणं टाळतो आणि मग चरबीचे थर अंगावर चढत जातात. मग एवढं वजन काय आजच्या एका दिवसात कमी होणार आहे? त्यापेक्षा एकदा सुरुवात केली की चार-सहा महिन्यांमध्ये वजन कमी करूनच थांबू असा विचार केला जातो. हासुद्धा चुकीचाच विचार. कारण एकदा म्हणजे कधी सुरुवात करायची हे ठरवायचं आपण टाळलेलंच असतं. ही सुरुवात आजच का करू नये, या विचाराकडेही आपण सोयिस्कर दुर्लक्ष करतो.

## जगातील पहिला 'बोन ग्लू' तयार




आरोग्य विज्ञान
डॉ. कुंदन गायकवाड

चिनी शास्त्रज्ञांनी वैद्यकीय क्षेत्रात एक महत्त्वाचा शोध लावला आहे. त्यांनी जगातील पहिला 'बोन ग्लू' तयार केला आहे. हा ग्लू केवळ दोन-तीन मिनिटांमध्ये तुटलेली हाडे जोडतो. तसेच हा ग्लू सहा महिन्यांमध्ये शरीरात विरघळतो. त्याचा शरीराला कोणताही प्रतिकूल परिणाम होत नाही. त्यामुळे आता शरीरातील हाड जोडण्यासाठी महागडे रॉड वापरण्याची गरज राहिलेली नाही. चिनी शास्त्रज्ञांनी 'बोन ०२' नावाचे एक बायोमटेरियल विकसित केले आहे. ते हाडे चिकटवण्यासाठी वापरले जाते. हा 'बोन ग्लू' ऑयस्टरपासून प्रेरणा घेऊन बनवलेला आहे. हा ग्लू हाड मोडलेल्या ठिकाणी इंजेक्शनद्वारे लावल्यास तुटलेली हाडे दोन-तीन मिनिटांमध्ये जोडली जातात. या आधी मोडलेले हाड जोडण्यासाठी धातूचे रॉड वापरले जायचे. काही काळानंतर हाड जोडल्यानंतर रॉड काढण्यासाठी दुसरी शस्त्रक्रिया करावी लागायची; मात्र हा 'ग्लू' हाड बरे झाल्यावर सहा महिन्यांनी स्वतःहून विरघळतो. त्यामुळे दुसरी शस्त्रक्रिया करण्याची गरज नाही. 'बोन ग्लू' हा एक चिकट पदार्थ आहे. हा 'ग्लू' रक्त असलेल्या भागातही घट्ट चिकटतो. शास्त्रज्ञांनी पन्नासहून जास्त वेळा याची चाचणी केली असून शेकडो प्रयोगदेखील केले आहे. हा 'ग्लू' शरीरासाठी सुरक्षित आहे. तो हाडांना बरे होण्यास मदत करतो आणि नंतर विरघळतो. चीनमधील वेन्झोऊ येथील डॉ. लिन आणि त्यांच्या टीमने हा 'ग्लू' विकसित केला आहे. आतापर्यंत दीडशेहून अधिक रुग्णांवर त्याची चाचणी घेण्यात आली आहे असून याचे निकाल चांगले आहेत. या 'ग्लू'मुळे तुटलेली हाडे, फ्रॅक्चर आणि ऑर्थोपेडिक शस्त्रक्रियांमध्ये क्रांती होणार आहे. यामुळे शस्त्रक्रियेचा वेळ आणि खर्च कमी होणार आहे. दरवर्षी जगभरातील लाखो लोकांची हाडे तुटतात. यावरील उपचार महागडे आणि वेदनादायक असतात. धातूचे रॉड लावल्यास लावल्याने संसर्गाचा धोका किंवा दुसरी शस्त्रक्रिया करण्याचा खर्च वाढतो; मात्र 'बोन ग्लू' या समस्येवर उपाय आहे.

आरोग्यभान

### कॅल्शियमची कमतरता असल्यास...




आता चुकीच्या जीवनशैलीचे परिणाम आपल्या आरोग्यावर होऊ लागले आहेत. आहारातल्या बदलांमुळे कमी वयात विविध आजारांना निमंत्रण मिळत आहे. हाडांच्या आरोग्यासाठी कॅल्शियम गरजेचं असतं. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हाडं ठिसूळ होऊ लागली आहेत. मात्र काही पदार्थांच्या सेवनामुळे शरीराला आवश्यक तेवढं कॅल्शियम मिळत नाही. शीतपेयांमधल्या कार्बन डाय ऑक्साइड आणि फॉस्फरसमुळे हाडं ठिसूळ होतात. शरीरात कॅल्शियम योग्य प्रकारे शोषलं जात नाही. यासह चॉकलेटमधल्या काही घटकांमुळेही शरीरातल्या कॅल्शियमचं प्रमाण कमी होतं.

आहारात मिठाचं प्रमाण मर्यादित असायला हवं. मिठातल्या सोडियममुळे शरीरातलं कॅल्शियम मूत्रावाटे बाहेर निघून जातं. म्हणूनच मिठाचं प्रमाण कमी ठेवण्याचा सल्ला दिला जातो. चहा-कॉफीचं अतिसेवनही शरीरासाठी घातक आहे. यातल्या कॅफेनमुळे शरीरातलं कॅल्शियम नष्ट होऊ लागतं.

जाणून घ्या

### स्पॉँडिलायसिस सतावतोय?




सध्या स्पॉँडिलायसिसचं प्रमाण वेगाने वाढत आहे. एके काळी प्रौढांना होणारा हा आजार आता तरुणांना विळख्यात घेत आहे. १०० पैकी एका तरुणाला आज स्पॉँडिलायसिस आहे. त्यातही पुरुषांना हा त्रास होण्याची शक्यता जास्त असते. बैठी जीवनशैली, बसण्याच्या, झोपण्याच्या चुकीच्या पद्धती, पोषक आहाराची कमतरता, व्यायामाचा अभाव ही स्पॉँडिलायसिसची कारणं आहेत. आयुर्वेदिक उपायांनी हा विकार नियंत्रणात ठेवता येईल. स्पॉँडिलायसिसच्या रुग्णांनी आम्ल म्हणजे आंबट तसंच कशाय पदार्थ खाऊ नयेत. लाल मांस, आंबट फळं असे अतिआम्लयुक्त पदार्थ टाळायला हवेत. बटाट्यांमुळे शरीरात वात दोष निर्माण होतो यामुळे हाडांचं नुकसान होऊ शकतं.

स्पॉँडिलायसिसमुळे जडणाऱ्या बद्धकोष्ठतेला कारक ठरणारे पदार्थ रुग्णांनी टाळायला हवेत. बद्धकोष्ठतेमुळे मानेतल्या वेदनांचं प्रमाण वाढतं तसंच मानेतले स्नायू आखडतात. गायीचं तूप वातशामक असतं.

हृदयारोग्य

### 'हार्ट फेल्युअर'चा मोठा धोका



भारतात मधुमेहानंतर हृदयरोगाचा धोका सर्वाधिक मानला जातो. मधुमेहामध्ये रुग्णाचे एकाएकी प्राण जाण्याची शक्यता कमी किंवा अगदीच नगण्य असते. मात्र हृदयरोगामध्ये हृदयविकाराचा झटका येऊन रुग्णाचे प्राण तडकाफडकीही जाऊ शकतात. विशेषत: 'हार्ट फेल्युअर'मध्ये रुग्णाचे प्राण जाण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे हृदयरोग, त्यातही 'हार्ट फेल्युअर' अधिक गंभीर मानला जातो. पण डॉक्टरांच्या मते 'हार्ट फेल्युअर' म्हणजे जीवनाचा अंत हे समीकरण आता बदलू लागलं आहे. 'हार्ट फेल्युअर'मध्ये रुग्णाच्या हृदयाचे स्नायू हळूहळू कमकुवत होत जातात आणि संपूर्ण शरीराला लागणाऱ्या रक्ताचा पुरवठा करण्यास असक्षम ठरतात. या व्याधीच्या सुरुवातीला शरीराचा रक्तपुरवठा वाढवण्यासाठी हृदय विशेष प्रयत्न करून स्वत:चा आकार वाढवतं आणि अधिक जोरात आकुंचन पावतं. याची परिणती हृदयाचा आकार वाढण्यात होते. या अवस्थेला 'एन्लार्ज्ड हार्ट' असं म्हटलं जातं. यात हृदयाच्या आकुंचन पावणाऱ्या स्नायूंचा आकार वाढतो आणि एकूणच स्नायूंचं वजनही वाढतं.

